POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-२०८ ● मुंबई, शुक्रवार, २८ फेब्रुवारी २०२५ ● पृष्ठ-४ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## एकाचवेळी २३ जणांची नोकरी गेली

पुण्यात घडलेल्या बलात्काराच्या घटनेमुळे महाराष्ट्र हादरला आहे. पुण्यातील स्वारगेट एसटी डेपोत बलात्कराची घटना घडली आहे. एसटी महामंडळाच्या शिवशाही बसमध्ये एका 26 वर्षीय प्रवासी महिलेवर बलात्कार झाला आहे. यामुळे महिलांच्या सुरक्षेबाबात प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या घटनेमुळे संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडाली असून संताप व्यक्त केला जात आहे. अशातच या बलात्कार प्रकरणात मोठी कारवाई करण्यात आली आहे. यामुळे एकाचवेळी २३ जणांची नोकरी केली आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी ही मोठी कारवाई केली आहे. स्वारगेट हे पुण्यातील सर्वात वर्दळीचे ठिकाण आहे. इथं नेहमीच मोठी गर्दी असते. अशातच स्वारगेट बस स्थानकात बलात्काराची घटना घडल्याने संताप व्यक्त केला जात आहे. पुण्यातील स्वारगेट एसटी डेपोमधील सर्व सुरक्षा रक्षकांना निलंबित करण्यात आलं आहे. डेपोतील शिवशाही बसमध्ये बलात्कार प्रकरणी डेपोमधील तब्बल २३ सुरक्षा रक्षकांना निलंबित करण्यात आलं आहे. उद्यापासून नवीन सुरक्षा रक्षक कामावर रुजू करण्याचे आदेशही परिवहन मंत्र्यांनी दिले आहेत. स्वारगेट डेपो मॅनेजर आणि वाहतूक नियंत्रक यांचे चौकशी करुन या प्रकरणात एक आठवड्यात अहवाल सादर करण्याचे आदेश परिवहन मंत्र्यांनी दिले आहेत. परिवहन आयुक्तांकडे हा अहवाल सादर केल्यानंतर पुढील कारवाईचा निर्णय होणार आहे.

## शिवशाही बसमध्ये २६ वर्षीय तरुणीवर बलात्कार
### स्वारगेट स्थानकात थांबलेली असतानाची घटना

■पुणे। प्रतिनिधी :

पुण्यात एक धक्कादायक घटना समोर आली आहे. एसटी महामंडळाच्या शिवशाही बसमध्ये प्रवासी महिलेवर बलात्कार झाल्याची घटना घडली आहे. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. स्वारगेट एस टी स्टँड आवारात ही घटना घडली असून या प्रकरणी आरोपीचा कसून शोध घेतला जात आहे. स्वारगेट बस डेपोत उभ्या असलेल्या शिवशाही बसमध्ये २६ वर्षीय तरुणीवर बलात्कार झाल्याचे समोर आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पीडित तरुणीला बळजबरीने बसमध्ये नेले आणि तिथे तिच्यावर अत्याचार करण्यात आले. ही सर्व घटना मंगळवारी मंगळवारी रात्रीच घडल्याचे समोर आले असून पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून आरोपीचा शोध सुरू केला आहे. या प्रकरणाची कसून चौकशी सुरू आहे. दरम्यान, पीडित तरुणी ही स्वारगेटवरुन फलटणला जात होती. तेव्हा आरोपींनी तरुणीला फलटणला जाणारी बस आहे असं सांगून दुसऱ्या बसमध्ये जायला सांगितले. तिथेच तिच्यावर अत्याचार करण्यात आला. आरोपीचे वय ३६ वर्षे इतके असून त्याच्यावर शिक्रापूर इथे गुन्हे दाखल आहेत. आरोपीच्या शोधासाठी आठ पथके रवाना झाली आहेत, अशी प्राथमिक माहिती आहे. स्वारगेट परिसरात नेहमी बऱ्यापैकी वर्दळ असते. मात्र मंगळवारी रात्री उशिरा या परिसरातील गर्दी कमी झाल्यानंतर हा प्रकार घडल्याचे सांगण्यात येतंय. रात्री महिला शिवशाही बसच्या जवळून जात असताना तिला आरोपीने बळजबरीने आत ओढून घेतले असल्याची माहिती समोर येत आहे. गेल्या काही दिवसांपासून पुण्यात गुन्हेगारीच्या घटनांत वाढ होताना दिसत आहे. मात्र, या प्रकारामुळं पुण्यातील महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. या प्रकरणात आणखी कोणी सहभागी आहे का याचा तपासदेखील पोलिस करत आहेत.



## बसमध्ये अत्याचार, कॅबमध्ये महिलेकडे पाहून हस्तमैथून
### महिला सुरक्षेसाठी गाडीत बसवल्या जाणाऱ्या 'पॅनिक बटन' चा बोजवारा

■मुंबई। प्रतिनिधी :

पुण्यातील स्वारगेट एसटी डेपोमध्ये २६ वर्षे तरुणीवर झालेल्या अत्याचारानंतर राज्यभरातून संतापाची लाट उसळली आहे. त्यानंतर दुसरीकडे कल्याणीनगर परिसरात २० वर्षीय कॅब ड्रायव्हरने महिला सॉफ्टवेअर इंजिनियर समोर गाडी चालवत असताना रियर व्ह्यू मिररमध्ये पहात हस्तमैथुन करण्यास सुरुवात केल्याची धक्कादायक घटना घडल्याने मोठी खळबळ उडाली. या दोन्ही घटनांमुळे महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

दरम्यान, दिल्लीतील निर्भय प्रकरण आणि पुण्यातील कॅब चालकाने तरुणीवर केलेल्या अत्याचाराच्या घटनेनंतर केंद्र आणि राज्य शासनाने खाजगी कॅब तसेच खाजगी ट्रॅव्हल्स व चारचाकी वाहनांमध्ये जीपीएसप्रणालीद्वारे तात्काळ मदत मिळावी यासाठी पॅनिक बटन बसवण्याचा निर्णय घेतला होता. गेल्या सात वर्षांनंतरही हे पॅनिक बटन काहीही काम करत नाही. या बटनाने पोलिसांना अलर्ट जातो ना कुणाला मदत हवी अशी माहिती मिळते. छत्रपती संभाजीनगरच्या पोलीस आयुक्तालयासमोरच एबीपी माझाने या पॅनिक बटनचा डेमो केला. यातून काही महत्त्वाच्या बाबी समोर आल्यात. पाहूयात खास रिपोर्ट.

**सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह, पॅनिक बटन फेल**

महिलांच्या सुरक्षेसाठी २०१७ मध्ये लागू करण्यात आलेल्या या स्थानिक बटनाच्या नियमाचा कुठलाही उपयोग होताना दिसत नाही. या पॅनिक बटन मधून ना पोलिसांना अलर्ट जातो मदत मिळते. त्यामुळे वाहनांमध्ये बसवलेले पाणी बटन्स केवळ देखाव्या पुरतच असल्याचे समोर आले आहेत. छत्रपती संभाजी नगरच्या पोलीस आयुक्तालयासमोर प्रत्यक्ष पॅनिक बटन दाबूनही पाहण्यात आले. मात्र कुठलाही अलर्ट यातून गेला नसल्याचे उघडकीस आले. यावरून राज्यभरातील खासगी बस कॅब आणि वाहनांमधील पॅनिक बटनची अवस्था काय असू शकते हे लक्षात येते.

**पॅनिक बटनाचा निर्णय अंमलबजावणीत फेल**

महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या शहरांमध्ये पॅनिक बटनचे नियम वेगळे आहेत .पुण्यात प्रवास करताना ड्रायव्हरच्या बाजूला आणि मागे बसलेल्या व्यक्तींनाही पॅनिक बटन दाबता यावं म्हणून दोन्ही दरवाजांच्या मधोमध पॅनिक बटन लावण्याचा नियम आहे .मात्र छत्रपती संभाजीनगर मध्ये ड्रायव्हरच्या बाजूला एकच पॅनिक बटन लावलं जातं .आता प्रश्न असा आहे की ड्रायव्हर जर अप्रिय घटना करत असेल ,तर त्याच्याच बाजूच पॅनिक बटन तो कसं दाबू देईल? प्रत्येक चार चाकी वाहनाला बटन बसवण्यासाठी १५००० रुपयांचा खर्च येतो. हे पाणी बटन बसवल्याशिवाय गाडीचं पासिंगही केलं जात नाही .मात्र हे बटन कामच करत नसेल तर त्याचा उपयोग काय? महिला सुरक्षेच्या नावाखाली केवळ निर्णय झाला मात्र अंमलबजावणी तो कसा फोल ठरला याचे हे उदाहरण आहे.

## कंडोम, साड्या, चादर, ब्लँकेट, अंतर्वस्त्र
### कोणत्या लॉजमध्ये नाही तर पुणे डेपोतील शिवशाही बसमध्ये सापडल्यात 'या' वस्तू

■पुणे। प्रतिनिधी :

विद्येचं माहेरघर असलेलं पुणे शहर बलात्काराच्या घटनेनं हादरल आहे. पुण्याच्या स्वारगेट बस स्थानकात मंगळवारी पहाटे शिवशाही बसमध्ये २६ वर्षीय तरुणीवर बलात्कार झाला आहे. यानंतर नराधम आरोपी फरार असून पोलिसांची आठ पथकं आरोपीच्या शोधासाठी रवाना करण्यात आली आहेत. स्वारगेट आगाराच्या आवारात भंगार शिवशाही बसेस उभ्या आहेत. या बसेसमध्ये अनैतिक कामं सुरु असल्याचा आरोप होऊ लागलाय. या बसेसमध्ये कंडोम, साड्या, चादर, ब्लँकेट, अंतर्वस्त्र आणि दारुच्या बाटल्या आढळल्या आहेत. तरुणीवर झालेल्या बलात्कार प्रकरणाच्या निमित्तानं रिकाम्या बसेसचा मुद्दा ऐरणीवर आला आहे.



बलात्काराच्या घटनेनंतर ठाकरे गटाचे नेते वसंत मोरेंनी. स्वारगेट बस स्थानकातील सुरक्षा कार्यालय फोडलं. बलात्काराच्या घटनेनंतर ठाकरेंची शिवसेना चांगलीच आक्रमक झाली होती. बसस्टँडवर उभ्या शिवशाही बसमध्ये एका तरुणीवर अत्याचार झाले. त्यामुळं स्वारगेट बस आगारातील असुरक्षिततेचा मुद्दा ऐरणीवर आलाय. त्यातच स्वारगेट बसस्टँडच्या आवारात भंगार शिवशाही बसेस तिथं उभ्या आहेत. तरुणीवरील अत्याचाराचं प्रकरण समोर आल्यानंतर आगारात उभ्या असलेल्या एका शिवशाही बसमध्ये महिलांचे कपडे आढळलेत.

शिवशाही बसमध्ये महिलांचे कपडे आले कसे असा सवाल वसंत मोरेंनी उपस्थित केलाय. स्वारगेट बसस्टँड किती असुरक्षित आहे हे तरुणीवरील बलात्कारानं अधोरेखित झालंय. त्यातच जुन्या भंगार बसेसचा वापर अनैतिक धंद्यासाठी केला जातोय का असा सवाल उपस्थित केला जातोय. फक्त कपडेच नाही तर कंडोम, चादर, ब्लँकेट, अंतर्वस्त्र सापडल्याचे समोर आले आहे.

या घटनेनंतर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी तातडीने कारवाई करत २३ सुरक्षा रक्षकांचे निलंबन केले आहे. तसेच बसस्थानक परिसरातील निर्लेखित केलेल्या अर्थात भंगारात काढलेल्या जुन्या बसेसची ताबडतोब विल्हेवाट लावणे आवश्यक असल्याच्या सूचना केल्या आहेत. या भंगार बसेस कडे दुर्लक्ष होत असल्याने या बसेस एक प्रकारे अवैध धंद्याचे अड्डे बनतात आणि त्यातून अशा घटनांना प्रोत्साहन मिळते. त्यामुळे भविष्यात कोणत्याही बसस्थानक परिसरात अशा प्रकारच्या भंगारात काढलेल्या बसेस उभ्या करण्यात येऊ नयेत असे निर्देश यावेळी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले आहेत.

## पुण्यात टॅक्सीमध्ये महिलेकडेपाहून ड्रायव्हरच नको ते कृत्य
### स्वागरगेट पाठोपाठ दुसरी धक्कादायक घटना

■पुणे। प्रतिनिधी :

पुण्यात वाढत्या गुन्हेगारी बरोबर महिला सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनत चालला आहे. पुण्यात वाहनांच्या तोडफोडीच सत्र सुरुच असतं. अधनं-मधनं पुण्याच्या अमुक एका भागात किंवा दुसऱ्या भागात टोळक्याने वाहनांची तोडफोड केल्याच्या बातम्या येतच असतात. आता पुणे शहर महिलांसाठी देखील असुरक्षित बनत चाललं आहे. नुकत्यात घडलेल्या दोन घटनांवरुन तसच दिसत आहे. पुण्यात स्वागरगेट एसटी डेपो परिसरात शिवशाही बसमध्ये एका तरुणीवर बलात्कार झाला. त्यानंतर पुण्यात टॅक्सीने घरी निघालेल्या एका आयटी प्रोफेशनल तरुणीसमोर एका कॅब चालकने धक्कादायक कृत्य केलं. त्यामुळे पुण्यात महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

कल्याणीनगर परिसरात एका २० वर्षीय कॅब ड्रायव्हरने महिला सॉफ्टवेअर इंजिनिअरसमोर गैरवर्तन केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. २१ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी ७:३० वाजता, कल्याणीनगरमधील एका कंपनीतील महिला सॉफ्टवेअर इंजिनिअरने प्रवास करण्यासाठी कॅब बुक केली. संगमवाडी रोडवर तिला घेण्यासाठी एक कॅब आली.

**हस्तमैथून करण्यास सुरुवात**

गाडी चालवत असताना, आरोपी ड्रायव्हरने रियर व्ह्यू मिररमधून पीडितेकडे पाहून हस्तमैथून करण्यास सुरुवात केली. यामुळे भयभीत झालेल्या तरुणीने महामार्गावर गाडी थांबवून थेट पोलिस स्टेशन गाठले. रविवारी खडकी पोलिसांनी २० वर्षीय कॅब ड्रायव्हरला अटक केली.

**आरोपी कुठल्या राज्यातला?**

खडकी पोलीस स्टेशनचे निरीक्षक गजानन चोरमले यांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी सुमित कुमार हा मूळचा उत्तर प्रदेशातील उन्नाव येथील असून, तो नुकताच मुंबईतून पिंपरी-चिंचवडला कामासाठी आला होता.

**आरोपी जामिनावर बाहेर**

महिलेने गुन्हा दाखल करताच पोलिसांनी तात्काळ तपास सुरु केला. महिलेनं ज्या अँप वरून कॅब बुक केली त्या माहितीच्या आधारे वाहन क्रमांक घेत कॅब चालकाला अटक केली. २१ फेब्रुवारीची ही घटना आहे आरोपी सुमित कुमार याला न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे.



## 'मित्रा माझ्या मुलींची काळजी घेशील' म्हणणाऱ्या दोस्ताच्याच मुलींवर केला बलात्कार!

■ठाणे। प्रतिनिधी :

पालघर जिल्ह्यातील विरारमध्ये एका ४५ वर्षीय व्यक्तीने आपल्या मित्राच्या मुलीसह तिच्या दोन मैत्रीणीवर बलात्कार केल्याची धक्कादायक घटना विरारमध्ये घडली आहे. या तिन्ही मुली अल्पवयीन असून त्यातील दोन मुली या सख्ख्या बहिणी आहेत. ज्यामध्ये या प्रकरणी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल होताच आरोपी फरार झाला. त्यानंतर पोलिसांनी शोध मोहिम सुरु केली. विरार पोलिसांनी या फरार झालेल्या आरोपीला गुजरात राज्यातील सुरत येथून अटक केली आहे.

अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव कमलाकर कदम असे आहे . आरोपीचा मित्र हा तुरुंगात होता. त्या मित्राने आपल्या पत्नी आणि १७ वर्षीय मुलीचा सांभाळ करण्याची विनंती केली होती. त्यानुसार कमलाकर कदमने तुरुंगात असलेल्या मित्राच्या पत्नी आणि मुलीला आपल्या घरी आश्रय दिला होता. दरम्यान, मुलीची आई घर सोडून गेल्यानंतर पीडित मुलगी एकटीच असल्याचा फायदा घेत आरोपी कदम याने तिच्यावर बलात्कार केला. सोबतच आरोपीने शेजारी असणाऱ्या त्यांच्या १३ वर्षांच्या अल्पवयीन मुलींवर देखील बलात्कार केला असल्याची माहिती पोलीस तपासात समोर आली आहे. या आरोपीवर पॉस्को अतंर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस या प्रकरणी अधिक तपास करीत आहेत. आरोपीवर कठोर कारवाई करण्याची मागणी सध्या करण्यात येत आहे.

आरोपीवर २३ फेब्रुवारी रोजी भारतीय न्याय संहिता (BNS) च्या कलम ६४ (२) (M) (पुन्हा त्याच महिलेवर बलात्कार करणे) आणि ६५ (१) (बारा वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलींवर बलात्कार करणे) आणि लैंगिक गुन्ह्यांपासून मुलींचे संरक्षण कायद्या अंतर्गत आरोपी विरोधात एफआयआर दाखल करण्यात आलाय.

**याआधीही १६ वर्षांच्या मुलीवर झाला होता बलात्कार**

दरम्यान, पालघर जिल्ह्यात आणखी एका घटना घडली असून एका १६ वर्षांच्या मुलीवर बलात्कार केल्याच्या आरोपाखाली एका व्यक्तीला अटक केली आहे. बलात्कारानंतर ती मुलगी गर्भवती राहिली असल्याचे एका अधिकाऱ्याने सोमवारी सांगितले. त्याचबरोबर २२ वर्षीय आरोपी आणि मुलगी दोघेही पालघरमधील नालासोपारा भागातील एकाच परिसरातील रहिवासी आहेत. ते एकमेकांना ओळखत होते. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गेल्या महिन्याच्या सुरुवातीला मुलगी घरी एकटी असताना आरोपी तिच्या घरी गेला आणि तिच्यावर बलात्कार केल्याचा आरोप आहे. असे आचोळे पोलीस ठाण्यातील अधिकाऱ्याने सांगितले. त्यांनी सांगितले की, अलिकडेच झालेल्या वैद्यकीय तपासणीत मुलगी सहा आठवड्यांची गर्भवती असल्याचे आढळून आलं आहे.




## शारदा एज्युकेशन सोसायटीच्या आनंद विश्व गुरूकुल महाविद्यालयामध्ये मराठी राजभाषा दिन उत्साहात साजरा

ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनानिमित्त मराठी वाङ्मय मंडळ वतीने मोठ्या उत्साहात अभिजात मराठी राजभाषा गौरवदिन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, प्राचार्या डॉ. सिमा हर्डीकर मॅडम यांनी केले. या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण म्हणजे अभिजात मराठी भाषेचे "अक्षरसुलेखन सौंदर्य" याविषयावर आधारीत, प्राचार्या डॉ. सिमा हर्डीकर मॅडम यांच्या संकल्पनेतून आणि उपप्राचार्या सौ.दीपिका तलाठी मॅडम यांच्या मार्गदर्शनानूसार, ठाणे शहरातील प्रख्यात चित्रकार, सुलेखनकार, आनंद विश्व गुरूकुलचे चित्रकला विभागप्रमुख प्रा. योगेश पंडीत सरांनी, साकारलेल्या तब्बल २फूट रूंद आणि १७फुट लांब असा भव्य सुलेखनपटाचे औपचारिक उद्घाटन, कविवर्य,अरूण म्हात्रे सर आणि प्रख्यात नाटककार,महाराष्ट्र राज्याचे साहित्य सांस्कृतिक मंडळ उपाध्यक्ष, आणि संस्थेचे सचिव गुरूवर्य प्रा.प्रदीप ढवळ सर यांच्या शुभहस्ते व इतर सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले. त्यानंतर साहित्यिक कवी, श्री. अरूण म्हात्रे सर प्रस्तुत, कवितेच्या ओठी - अभिजात मराठी हा विशेष कार्यक्रम संपन्न झाला. यात प्रा.फाल्गुनी जोशी नातू, यांनी गीत गायन केले. तर संगीत साथ प्रा.रविराज अडसूळ यांची लाभली. या सांगेतिक मैफिलीला रसिक श्रोत्यांनी उत्तम प्रतिसाद दिला. यानंतर शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा काव्यवाचनाचा कार्यक्रम पार पडला. यावेळी संस्थेचे खजिनदार मा. श्री. अक्षरजी पारसनीस सरांनी सुद्धा यावेळी स्वरचित कविता सादर केली. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. योगेश पंडीत सरांनी केले. तर आभार प्रा. सागर जाधव सरांनी मानले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## दक्षिण कोरियाच्या 'एचएस ह्युसंग कंपनी'ची नागपूरमध्ये १ हजार ७४० कोटींची गुंतवणूक
### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत उद्योग विभागाशी सामंजस्य करार

**ह्युसंग कंपनीविषयीः**

ह्युसंग समूह ही दक्षिण कोरियन कंपनी असून टेक्सटाईल्स, केमिकल्स, अवजड उद्योग, माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान आणि लॉजिस्टिक्स यासारख्या विविध क्षेत्रांमध्ये कार्यरत आहे. ही कंपनी कार्बन फायबर, अरामिड फायबर, टायर कॉर्ड, ऑटोमोटिव्ह सीट बेल्ट यार्न, हाय-स्ट्रेंथ इंडस्ट्रियल यार्न आणि फॅब्रिक्स यांच्या उत्पादनात आघाडीवर आहे. ह्युसंग कॉर्पोरेशन इंडिया प्रा.लि.ची हरियाणा, मुंबई, पुणे आणि चेन्नई येथे कार्यालये आहेत. पुणे येथील प्रकल्प २०१५ पासून कार्यरत असून येथे ३५० कर्मचारी आहेत. या कंपनीची ₹.८४५ कोटींची वार्षिक उलाढाल आहे. छत्रपती संभाजीनगर येथील औरिक -शेंद्रा येथे ही कंपनी २०१८ पासून कार्यरत असून येथे ५०० कर्मचारी काम करत आहेत. याठिकाणीही कंपनीची वार्षिक उलाढाल ₹. १ हजार ६५० कोटी रुपयांची आहे.

■मुंबई। प्रतिनिधी :

महाराष्ट्र शासनाचा उद्योग विभाग आणि दक्षिण कोरियाच्या एचएस ह्युसंग अँडव्हान्स मटेरियल्स कॉर्पोरेशन कंपनी यांच्या दरम्यान १ हजार ७४० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचा सामंजस्य करार करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत या सामंजस्य करारावर उद्योग विभागाचे सचिव डॉ. पी.अन्बलगन आणि एचएस ह्युसंग अँडव्हान्स मटेरियल्स कॉर्पोरेशनचे अध्यक्ष सीऑंग यांनी स्वाक्षरी केली. कंपनीने ही गुंतवणूक नागपूरच्या बुटीबोरी येथे ॲडव्हान्स्ड मटेरियल्स उत्पादन क्षेत्रात केली असून यामुळे ४०० स्थानिक रोजगारांच्या संधी उपलब्ध होणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. ह्यह्युसंग कंपनी नागपूरच्या बुटीबोरी येथे नवीन अध्याय सुरू करत असून, कंपनी पुणे आणि छत्रपती संभाजीनगर सोबतच आता नागपुरात आपल्या कायार्चा विस्तार करत असल्याचे पाहून आनंद होत आहे. महाराष्ट्रात यापुढेही अनेक प्रकल्प गुंतवणूकीसाठी पुढे येत राहतील, असा विश्वासही यावेळी मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी व्यक्त केला. सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे झालेल्या या सामंजस्य करार प्रसंगी मुख्यमंत्र्यांच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, मुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. श्रीकर परदेशी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी.वेलारासू, उद्योग विभागाचे सहसचिव श्रीकांत पुलकुंडवार, ह्युसंग कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक सी इयान ली, वरिष्ठ सल्लागार कॅ. शिवाजी महाडकर, संचालक मनोजित साह, उपव्यवस्थापक नीरज हांडा उपस्थित होते.



संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# मग कर्तव्यात कसूर का?

निर्णय वेगवान महाराष्ट्र गतिमान...महाराष्ट्र आता थांबणार नाही...अशा कितीही घोषवाक्यांचे बुडबुडे सोडले तरी सरकारमधील रुसवे-फुगवे सुरूच असल्याने सरकार स्थापनेपासून पालकमंत्री निश्चितीपर्यंत केवळ दिरंगाईच पाहायला मिळत आहे. राज्यात २०२२ मध्ये सत्तांतर झाल्यानंतर हेच सुरू आहे. भाजप आपली पकड ढिली करायला तयार नाही आणि मित्रपक्षांना भाजपचा प्रत्येक निर्णय मान्य नाही. असे त्रांगडे गेली साधारणपणे तीन वर्षे पाहायला मिळत आहे. एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांनी अनुक्रमे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतल्यावर जवळपास सव्वा महिन्याने मंत्रिमंडळ विस्तार झाला होता. त्यानंतर वर्षभराने दुसरा शपथविधी, तर आता २३ नोव्हेंबर २०२४ला निर्विवाद बहुमत मिळाल्यानंतर मुख्यमंत्रिपदावर घोडे अडले होते. एकनाथ शिंदे या पदासाठी अडून राहिले होते, पण नंतर दिल्लीतील भाजप नेतृत्वाने हस्तक्षेप केल्यावर हा तिढा सुटला. तेव्हा निकालानंतर १२ दिवसांनी महायुतीने सरकार स्थापन केले. त्यापुढे १० दिवसांनी मंत्रिमंडळ विस्तार आणि त्यानंतर आठवडाभराने खातेवाटप! त्यात पालकमंत्रिपदाचा घोळ अद्यापही सुरू आहेच. त्यात प्रामुख्याने नाशिक आणि रायगडच्या पालकमंत्रिपदाचे घोंगडे भिजतच आहे. आता त्यात मंत्र्यांचे ओएसडी अर्थात विशेष कार्य अधिकारी तसेच खासगी सचिव यांच्या नेमणुका रखडलेल्याच आहेत. त्यामुळे महायुतीमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्री वगळता उर्वरित ३९ मंत्र्यांकडे एकूण १५६ कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात येत आहेत. बनावट दस्तवेजांद्वारे शासकीय कोट्यातील सदनिका बळकावल्याप्रकरणी शिक्षा ठोठावलेले कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी मनातील ही खदखद अलीकडेच बोलून दाखवली होती. प्रत्येक मंत्र्याकडे ओएसडीसह खासगी सचिव कोण असतील हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेच ठरवत असल्याने आमच्या हातात काहीच नाही, असे ते पुण्यात म्हणाले होते, तथापि हे अधिकार मुख्यमंत्र्यांचेच असतात, असे फडणवीस यांनी स्पष्ट करून एक महत्त्वाची टिप्पणीदेखील केली. माझ्याकडे १२५ जणांची नावे आली होती, त्यातील १०९ नावांना मी मान्यता दिली आहे. उर्वरित १६ नावांना परवानगी दिली नाही, कारण त्यांच्यावर कुठला ना कुठला आरोप आहे, असे ते म्हणाले होते. 'ना खाऊंगा और न खाने दूंगा,' अशी घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१४ मध्ये दिली होती. त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवून सरकारची स्वच्छ प्रतिमा जपण्यासाठी देवेंद्र फडणवीस यांनी घेतलेली ही भूमिका प्रशंसनीय आहे, पण यातून काही प्रश्नही समोर येतात. मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासमोर आलेल्या यादीमधील १६ अधिकाऱ्यांवर कोणता ना कोणता तरी ठपका आहे तर एकूण सरकारी व्यवस्थेत असे किती ठपका असलेले अधिकारी आहेत? या सर्वांचा निश्चित आकडा सरकारकडे आहे का? अशा अधिकाऱ्यांची यादी कशी उपलब्ध होईल? सर्वात महत्त्वाचे म्हणजे एवढी माहिती सरकारकडे असतानाही या अधिकाऱ्यांवर अद्याप कारवाई झाली नाही का? आणि झाली असेल तर ते अधिकारी कोण आहेत? अर्थातच या प्रश्नांची उत्तरे सरकारकडून दिली जातील, अशी अपेक्षा करणे वेडेपणाचे ठरेल. राज्यात गेल्या पाच वर्षांत राजकीय समीकरणे बदलल्यानंतर आरोप-प्रत्यारोप आणि दावे-प्रतिदावे केले जात आहेत. तसे पाहिले तर राष्ट्रीय स्तरापासून राज्य स्तरापर्यंत हेच चालत आले आहे, मात्र कधीकाळी एकाच पक्षात असलेले नेते आता व्यक्तिगत स्तरापर्यंत टीका-टिप्पणी करीत आहेत. एकमेकांची उणीदुणी काढत आहेत. सध्या अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे हे विरोधकांसह सत्ताधाऱ्यांच्या निशाण्यावर आहेत. बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी त्यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी या सर्वांनी थेट राजभवनावर धाव घेतली होती. परळी नगर परिषदेचा माजी नगराध्यक्ष वाल्मिक कराड याचे नाव या खून प्रकरणात घेतले जात असून तो धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय असल्याचे सांगण्यात येते. भाजप आमदार सुरेश धस या प्रकरणाचा पाठपुरावा करीत आहेत. याशिवाय आमदार सुरेश धस यांच्यासह सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी धनंजय मुंडे यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप केले आहेत. त्यामुळे येथेही हाच प्रश्न उपस्थित होतो की मंत्र्यांकडील ओएसडी आणि पीए यांच्या नियुक्त्यांबाबत चाळणी लावली जाते, मग मंत्र्यांना मोकळीक का? आरोप असल्याने नियुक्ती रोखण्याच्या निर्णयाने कोणी नाराज झाले तरीही मी अशा लोकांच्या नावाला मान्यता देणार नाही, असे फडणवीस यांनी ठणकावून सांगितले असले तरी अशा मंत्र्यांना मंत्रिमंडळात स्थान कसे? आता धनंजय मुंडे हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते असल्याने त्याचा निर्णय उपमुख्यमंत्री अजित पवार घेतील अशी पळवाट काढणे योग्य ठरणार नाही. शेवटी सरकारचे प्रमुख म्हणून निर्णय देवेंद्र फडणवीस यांनी घेतला पाहिजे, तसे अपेक्षितच आहे, पण निवडणुकीपूर्वी ज्याच्या विरोधात रान उठवले आणि सत्तेत आल्यावर त्यालाच घरी बोलावून भ्रष्टाचार प्रकरणाची फाईल दाखवणारे फडणवीस असा काही निर्णय घेतील असे वाटत नाही.

# बेकायदा लग्न आणि कायद्याची गोष्ट!

**हिंदू विवाह कायद्यानुसार जे विवाह बेकायदा ठरविले आहेत, अशा विवाहांमध्ये जोडीदारांपैकी एकाला दुसऱ्याकडून पोटगी मागण्याचा अधिकार आहे का, असा प्रश्न सर्वोच्च न्यायालयापुढे होता. कारण जर लग्नच बेकायदा होते, तर मग पोटगी कशाची, असा प्रश्न उरतोच. यासंदर्भात याआधी सर्वोच्च व विविध उच्च न्यायालयांनी निकाल दिले आहेत. पण त्या निकालांमध्ये विरोधाभास असल्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने अधिकारवाणीने यासंदर्भात निकाल द्यावा, यासाठी तीन न्यायाधीशांच्या खंडपीठापुढे या प्रकरणाची सुनावणी झाली.**

लग्न ही ह्यत्याह्लच्या आणि ह्यतिह्लच्या आयुष्यातील नव्या पर्वाची सुरुवात असते. दोघांनी एकमेकांना सांभाळून घेत पुढे जायचे असते. प्रत्येक जोडपं एकमेकांना साजेसं असेल, अशी शक्यता फार कमी असते. पण ज्याच्यासोबत लग्न झाले, त्याच्याशी मिळते-जुळते घेतच संसार हळूहळू पुढे जातो. अर्थात लग्न केलेल्या प्रत्येक जोडप्याबाबत असे घडतेच, असे नाही. वेगवेगळ्या कारणांमुळे एकमेकांशी पटत नाही, त्यातून वादविवाद होऊ लागतात.

मग त्याच्या आणि तिच्या घरचे एकमेकांच्या विरोधात वेगवेगळे आरोप करू लागतात. एकमेकांच्या घरच्यांना यामध्ये ओढले जाते. त्यातूनच विषय बिनसत जातो आणि मग घटस्फोटापर्यंत येऊन ठेपतो. लग्नाच्या दिवशी कोणालाच आपल्या संसाराचे पुढे काय होईल, हे माहिती नसते. पण जर हा प्रवास घटस्फोटाच्या दिशेने गेला तर मग कायदा काय सांगतो, याची माहिती दोघांना आपापल्या वकिलांकडून घ्यावी लागते.

सर्वोच्च न्यायालयाने अगदी याच महिन्यात एक महत्त्वाचा निकाल दिला. तो निकाल अशासाठी महत्त्वाचा आहे की, आपल्याकडे हिंदू विवाह कायद्यानुसार, काही विवाह हे बेकायदेशीर ठरविण्यात आले आहेत. म्हणजे काय तर कायद्याने सांगितलेल्या काही परिस्थितींमध्ये विवाह झाला असेल, तर कायद्यानुसार तो विवाह गृहितच धरण्यात येत नाही.

ज्याला इंग्रजीमध्ये void म्हटले जाते. हिंदू विवाह कायद्यातील कलम ११ मध्ये याबद्दल सविस्तरपणे लिहिले आहे. त्यातही अशा पद्धतीने झालेले विवाह हे जेव्हापासून जोडपे लग्नबंधनात अडकले, त्या दिवसापासूनच बेकायदा ठरवले जातात. म्हणजे त्या दोघांचे लग्न झालेच नव्हते, असे आपण म्हणू शकतो. जर एकदा न्यायालयाने विवाहच बेकायदा ठरविला, तर मग घटस्फोटाचा प्रश्नच येतो कुठे, असा प्रश्न पडू शकतो.

हिंदू विवाह कायद्यानुसार जे विवाह बेकायदा ठरविले आहेत, अशा विवाहांमध्ये जोडीदारांपैकी एकाला दुसऱ्याकडून पोटगी मागण्याचा अधिकार आहे का, असा प्रश्न सर्वोच्च न्यायालयापुढे होता. कारण जर लग्नच बेकायदा होते, तर मग पोटगी कशाची, असा प्रश्न उरतोच. आता हा काही नवा प्रश्न नाही. कारण यासंदर्भात याआधी सर्वोच्च व विविध उच्च न्यायालयांनी निकाल दिले आहेत.



पण त्या निकालांमध्ये विरोधाभास असल्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने अधिकारवाणीने यासंदर्भात निकाल द्यावा, यासाठी तीन न्यायाधीशांच्या खंडपीठापुढे या प्रकरणाची सुनावणी झाली. या खंडपीठामध्ये न्या. अभय ओक, न्या. अहसानुद्दीन अमानुल्लाह आणि न्या. ऑगस्टिन जॉर्ज मसीह यांचा समावेश होता. न्या. अभय ओक यांनी अतिशय सविस्तरपणे यासंदर्भात निकालपत्र लिहिले. जे वाचल्यानंतर विविध गोष्टींचा उलगडा होतो.

विषय पोटगीचा आहे तर आधी हे समजून घेतले पाहिजे, की हिंदू विवाह कायद्यानुसार पोटगी काही फक्त पत्नीच आपल्या पतीकडून मागू शकत नाही, तर पतीही पत्नीकडून मागू शकतो. फक्त त्याला किंवा तिला आपल्याकडे उत्पन्नाचा काहीही स्रोत नाही, हे न्यायालयापुढे सिद्ध करावे लागते. त्यातही पोटगी ही परत दोन पद्धतीने मागता येते. न्यायालयात दावा प्रलंबित असताना मिळणारी पोटगी आणि न्यायालयाने दाव्याचा अंतिम निकाल देताना दिलेली पोटगी.

या पलीकडे जाऊन भारतीय नागरिक सुरक्षा संहितेतील कलम १४४ नुसारही पोटगी मागता येते. फक्त फरक इतकाच आहे की या स्थितीत केवळ पत्नी आणि मुले अनुक्रमे आपल्या पतीकडून, वडिलांकडून पोटगी मागू शकतात. या कायद्यानुसार पती पत्नीकडून पोटगी मागू शकत नाही. हिंदू विवाह कायदा आणि भारतीय नागरिक सुरक्षा संहितेतील हे कलम यामध्ये हाच मूलभूत फरक आहे.

आधी म्हटल्याप्रमाणे सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने आणि उच्च न्यायालयाने या संदर्भात त्या त्या दाव्यातील परिस्थितीनुसार परस्परविरोधी निकाल दिले होते. यामध्ये चांद धवन वि. जवाहरलाल धवन आणि रमेशचंद्र डागा वि. रामेश्वरी डागा या दाव्यांमध्ये विवाह बेकायदा ठरविला तरी पोटगी देण्याचा निकाल देण्यात आला होता. यमुनाबाई आढाव वि. अनंतराव आढाव, सविताबेन भाटिया वि. गुजरात सरकार या दाव्यांमध्ये अशा पद्धतीने पोटगी दिली जाऊ शकणार नसल्याचे न्यायालयाने म्हटले होते.

आता बेकायदा विवाह कसे होतात, हेसुद्धा समजून घेतले पाहिजे. यामध्ये प्रामुख्याने आधी लग्न झालेले असताना त्याच्याकडून किंवा तिच्याकडून आधीच्या जोडीदाराला फसवून दुसरे लग्न केले जाते. जे हिंदू विवाह कायद्यानुसार अमान्य आहे. दुसरीकडे रक्तातील काही नातेसंबंधांमध्ये लग्न होऊ शकत नाही. पण तसेही लग्न लावले जाते. जे सुद्धा बेकायदा आहे. अशा पद्धतीने लग्न झाल्यावर जेव्हा विषय घटस्फोटापर्यंत येतो, त्यावेळी न्यायालयाला संबंधित दाव्यातील सर्व तथ्ये नीट तपासून बघावी लागतात. ते काम अर्थात पुराव्यांच्या आधारे केले जाते आणि निष्णात वकील न्यायालयांना त्यासाठी मदत करीत असतात.

सर्वोच्च न्यायालयाने निकाल देताना, हिंदू विवाह कायदा, १९५५ च्या निर्मितीवेळी तेव्हाच्या कायदे मंडळाने अर्थात संसदेने लग्न बेकायदा ठरविल्यानंतर पोटगी देण्यासंदर्भात काही वेगळा विचार केला होता का, तसे संबंधित कायद्यातील तरतुदींवरून दिसते का, याचाही विचार केला. पण यासंदर्भात कायदेमंडळाने कोणतीही वेगळी तरतूद संबंधित कायद्यामध्ये केली नसल्याचे न्यायालयाने म्हटले आहे.

आता प्रश्न उरतो तो म्हणजे हिंदू विवाह कायद्यातील तरतुदींनुसार तिला किंवा त्याला पोटगी मंजूर करताना लग्नाच्या कायदेशीरपणाबद्दलचा विचार करायचा की नाही? तर याबद्दल सर्वोच्च न्यायालयाने अत्यंत नेमकेपणाने म्हटले आहे की, हिंदू विवाह कायद्यातील कलम ११ नुसार विवाह बेकायदा असल्याचा निकाल न्यायालयाने दिल्यानंतरही संबंधित दाव्यामध्ये तिला किंवा त्याला पोटगी मिळू शकते. तिच्या किंवा त्याच्या संबंधित अजार्चा न्यायालयाने विचार केला पाहिजे.

विवाहच बेकायदा होता म्हणून पोटगी मिळू शकत नाही, ही मांडणी सर्वोच्च न्यायालयाने स्पष्टपणे फेटाळली. फक्त अशा पद्धतीच्या सर्व दाव्यांमध्ये पोटगी मंजूर करायची की नाही, हे संबंधित दाव्यातील तथ्यांवर आणि पक्षकारांच्या एकूणच वर्तणुकीवर अवलंबून असेल. म्हणजे काय तर तिला किंवा त्याला पोटगी मिळण्यासाठी हिंदू विवाह कायद्यातील कलम ११ अडथळा ठरणार नाही. या दोन्हीचा स्वतंत्रपणे विचार केला जाऊ शकतो.

सर्वोच्च न्यायालयाने याच निकालपत्रात आणखी एक महत्त्वाचा उल्लेख केला आहे. राज्यघटनेने देशातील प्रत्येक नागरिकाला सन्मानाने जगण्याचा अधिकार दिला आहे. राज्यघटनेच्या अनुच्छेद २१ मध्ये याबद्दल सविस्तरपणे लिहिले आहे. त्यामुळे न्यायालयांनीही शब्द अतिशय जपून वापरले पाहिजेत.

हिंदू विवाह कायद्यातील कलम ११ नुसार विवाह बेकायदा ठरविला, तर पत्नीचा 'अनैतिक पत्नी' म्हणून उल्लेख करणे हे राज्यघटनेतील तरतुदींच्या विरोधात आहे. त्यामुळे न्यायालयांनी अशा पद्धतीचे शब्दप्रयोग आणि उल्लेख टाळले पाहिजेत, असे सांगत उतरंडीमध्ये खालच्या स्तरावर असलेल्या न्यायालयांचे कान टोचून त्यांना योग्य दिशाही दिली आहे.

लग्न मोडू नये, ते टिकवलं पाहिजे, यासाठी नातेवाईकांप्रमाणेच न्यायालयेही प्रयत्न करीत असतातच. अर्थात सगळ्या दाव्यांमध्ये ते शक्य होत नाही आणि दोघांमध्ये काडीमोड होतो. लग्नासारख्या पवित्र संस्काराचा वापर करून कोणी कोणाला फसवू नये किंवा कोणाकडून पैसा उकळण्याचा प्रयत्न करू नये, यासाठी न्यायालयांचे स्थान महत्त्वाचे आणि अनन्यसाधारण आहे. बाकी कुटुंब तुटण्याचे दुःख हे ज्याचे त्यालाच माहिती असते. ते फक्त तो किंवा ती अनुभवू शकते. ते शब्दांत मांडणे सहज शक्य नसते.

# गंगा तेरा पानी...



उत्तर प्रदेशातील महाकुंभ मेळ्याच्या अनुषंगाने सोशल मीडियावर एक कथन सातत्याने पसरवले जात होते. 'ज्या प्रयागराज येथे कोट्यवधी भाविक स्नान करीत आहेत, तिथले पाणी मुळीच दूषित झालेले नाही,' हे ते कथन. पण हे कथन त्याच पाण्यात बुडवणारे एक वास्तव समोर आलेले आहे... 'कोट्यवधी भाविक स्नान करीत असलेले संगमावरील पाणी स्नानास अयोग्य आहे, त्यात विष्ठेतील जीवाणू आहेत.' १२ जानेवारी ते ८ फेब्रुवारी या कालावधीतील जलप्रदूषणाच्या आकडेवारीस धरून हा निष्कर्ष काढण्यात आलेला आहे. बरे, हा निष्कर्ष कुणा स्वयंसेवी संस्थेने, 'फुरोगामी' संघटनेने काढलेला नाही. हा आरसा दाखवला आहे केंद्रीय पर्यावरण आणि जल वायू मंत्रालयाच्या अखत्यारित येणाऱ्या केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने. मेंदू नामक अवयवाचा वापर न करता, सोशल मीडियावरील सोयीचे संदेश पुढे ढकलणाऱ्यांनी जरा कष्ट घेऊन मंडळाची वेबसाइट त्यासाठी पाहणे उचित ठरेल. पण मुद्दा असा की, खुद्द उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री आदित्यनाथच जर केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाचा हा निष्कर्ष गंगेच्या पाण्यात बुडवून टाकत असतील तर त्याचे होणार काय? या योगींचे तर म्हणणे असे, की हे पाणी पिण्यासही चालेल! वास्तविक, जेथे कोट्यवधी लोक अंघोळ करत असतील, सवस्त्र डुबक्या मारत असतील तिथले पाणी प्रदूषित होणे ही अगदीच स्वाभाविक गोष्ट. गंगेचे पाणी अशुद्ध होऊच शकत नाही, अशी श्रद्धा बाळगावी कुणी बापडी; पण म्हणून शास्त्रशुद्ध चाचण्यांचे निष्कर्षच धुडकवायचे ही कुठली रीत झाली? वास्तविक, 'असे काही प्रदूषण असल्यास त्यावर उपाय करू,' अशी भूमिका आदित्यनाथ यांनी घेणे उचित ठरले असते. पण असा निष्कर्ष महाकुंभास येणाऱ्यांच्या संख्येवर परिणाम करेल व तेजीत असलेल्या अर्थकारणास थोडे ग्रहण लावेल, अशी भीती त्यांना वाटलेली असू शकते.

# निविदांसाठी कायदा सर्वांनाच नकोसा!



निविदांची प्रक्रिया अपारदर्शक आहे. कोणी कुठली निविदा घ्यायची हे आपसात ठरवूनच स्पर्धक या प्रक्रियेत सहभागी होतात. सत्ताधारी अथवा विरोधक कुणीही निविदा वा लिलाव प्रक्रियेबाबत कायदा करा, अशी मागणी करत नाहीत...

शासकीय विकासकामांची पहिली पायरी असते, त्या कामांची निविदा. गेल्या काही वर्षांत शासकीय कामांच्या निविदांच्या प्रक्रियेवर अनेक आरोप-प्रत्यारोप होऊ लागले आहेत. निविदा, लिलावांचे नियम हे पूर्णतः प्रशासनाच्या माध्यमातून सत्ताधीशांना अनुकूल असेच ठरवले जातात. सामान्य नागरिक निविदा प्रक्रियेबाबत पूर्णतः अनभिज्ञ आहे. कायद्याचा अभाव आणि सामान्य नागरिकांचा प्रत्यक्ष संबंध येत नसल्याने निविदा प्रक्रियेला संघटित गुन्हेगारीचे स्वरूप आले आहे, असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. शासकीय निविदांची कामे ही ठरावीक कंपनी अथवा व्यक्तीलाच मिळणार हे उघडपणे बोलले जाते. या क्षेत्रात आता स्पर्धक कमी आणि सामंजस्य अधिक आहे. निविदांची वाटणीच आता समसमान तत्त्वावर आधारलेली आहे. कोणी कुठली निविदा घ्यायची हे आपसात ठरवूनच स्पर्धक या प्रक्रियेत सहभागी होतात. काही वाद झालेच तर तथाकथित निकटवर्तीय दलाल त्यात मध्यस्थी करून योग्य मोबदला मिळवून देतात, अशी चर्चा आहे.

### २ जी स्पेक्ट्रम लिलाव

संयुक्त पुरोगामी आघाडी (संपुआ) काळातील २-जी स्पेक्ट्रम घोटाळ्याबाबत तत्कालीन विरोधी पक्षांनी गंभीर आरोप केले होते. परिणामी, त्या सरकारची प्रतिष्ठा लयास गेली. पुढे देशात सत्तांतर झाले. २-जी स्पेक्ट्रम घोटाळ्यात झालेला तपास आणि ज्येष्ठ राजकीय नेत्यांची त्यातून झालेली सुटका या घटना आता विस्मृतीत गेल्या आहेत. संपुआ सरकारच्या काळात विरोधी पक्ष, न्यायालये, माध्यमांच्या दबावामुळे २-जी स्पेक्ट्रम लिलाव प्रकरणात खटले दाखल झाले. २१ डिसेंबर २०१७ रोजी आरोपींची सुटका झाली ती विद्यमान भाजप सरकारच्या काळात. संपुआ सरकारने या प्रकरणात तपास योग्य पद्धतीने केला नाही, अशी टीका भाजपकडून सातत्याने झाली. परंतु २०१४ नंतर याबाबतचे निकाल लागले त्यात तत्कालीन केंद्रातील भाजप सरकारने फेरतपास, पुरवणी आरोपपत्र दाखल करण्याचे अधिकारात असूनही कायदेशीर पर्यायांचा वापर केल्याचे स्मरणात नाही. २-जी घोटाळ्यात भ्रष्टाचार झाला असेल अथवा नसेल, परंतु कायदा नसल्याचा फायदा मात्र दोन्ही बाजूने झाला. २-जी स्पेक्ट्रम तथाकथित घोटाळ्यासाठी लिलाव निमित्त ठरला.

### सत्ताधीशांनाच मनमानीची मुभा

निविदा, लिलाव प्रक्रिया पारदर्शक असल्याचे कितीही दावे केले गेले तरीही ते पचनी पडत नाही. निविदा प्रक्रियांसाठी कायदाच नसल्याने हवे तसे नियम लावत हव्या त्या व्यक्तीला निविदा मिळवून देण्याची मुभा सत्ताधीशांना आहे. सत्ताधीशांच्या हातातले प्रशासन हवे तसे नियम ठरवून ही प्रक्रिया अमलात आणते. या सर्व प्रक्रियेत सत्ताधारी अथवा विरोधक कुणीही निविदा अथवा लिलाव प्रक्रियेबाबत कायदा करा, अशी मागणी करत नाहीत. निविदा, लिलाव प्रक्रियेत कायदा असू नये याबाबत सत्ताधीश आणि विरोधकांचे एकमत दिसते. विरोधात असलेल्यांना कधीतरी सत्तेत गेल्यावर हवे तसे निकष लावत तीच प्रक्रिया अमलात आणायची असते. स्थानिक स्वराज्य संस्था ते केंद्रीय स्तरापर्यंत निविदा, लिलाव हे राजकीय पक्षांचे सर्वांत मोठे आर्थिक स्रोत आहेत. प्रक्रियेसंबंधी कायदाच नसल्याने निविदा अथवा लिलावांच्या बाबतीत न्यायालयीन निकालांतील असमानता प्रकर्षाने दिसून येते. जामीन संबंधित कायदा करावा अशी सूचना नुकतीच सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला केली होती. त्यावर केंद्राने सपशेल नकार दिला. कायदा करण्याचा अधिकार विधिमंडळाचा असल्याने न्यायालयीन अधिकारांना मर्यादा आहेत. या परिस्थितीत तथ्य आणि परिस्थितीनुसार न्यायालयास निकाल देणे इतकेच मर्यादित अधिकार शिल्लक राहतात. परिणामी, निविदा प्रक्रियेत न्यायालयीन निकालात असमानता दिसून येते.

निविदा प्रक्रियांना आव्हान द्यायचे झाल्यास अत्यंत कमी कालावधी, ही सर्वात मोठी कायदेशीर अडचण आहे. न्यायालयाने स्थगनादेश दिल्यास प्रकरणात काहीतरी निर्णय येण्याची शक्यता असते. अनेकदा तर निविदा देण्याचा प्रशासकीय आदेश झाल्याने न्यायालयात आव्हान दिलेले कायदेशीर प्रकरण तसेच संपुष्टात येते. निविदा प्रक्रियासंबंधी कायदा झाल्यास उच्च व सर्वोच्च न्यायालयातील याचिकांची संख्या कमी होईल. निविदा प्रक्रियेत सत्ताधारी, विशिष्ट व्यक्ती, उद्योगपती, कंत्राटदारांचा होणारा बेहिशोबी फायदा यावर कुठलेच नियंत्रण नाही. किंबहुना, तसे नियंत्रण निविदा काढणारे आणि घेणारे यांनाही नको आहेत. निविदांसाठी कुठलाही कायदा अस्तित्वात नसल्याचे हे दुष्परिणाम आहेत. कायदा असला तर त्यात पळवाटा शोधल्या जातात इथे प्रशासनाच्या कारभारात तर निकष, नियम बदलांचे महामार्गच उपलब्ध आहेत. भारतीय करार कायदा, दिवाणी प्रक्रिया संहिता आणि लवाद कायदा यावरच निविदांचे कायदेशीर अस्तित्व टिकून आहे, तेसुद्धा निविदेतील काम मिळाल्यावरच उपयुक्त ठरणारे. निविदेची कायदेशीर व्याख्या बोली लावण्यास दिलेले आमंत्रण. यात न्यायालयांना हस्तक्षेप करण्याचे मर्यादित अधिकार आहेत.

निविदा प्रक्रिया पाहता न्यायालयापेक्षा कितीतरी अधिक अधिकार कायद्याचे ज्ञान नसलेल्या प्रशासकीय यंत्रणेने स्वतःकडे ठेवले आहे. अगदीच एकतर्फी निविदा बहाल केली गेली असल्यास, ती रद्द केली जावी, असे बरेच न्यायालयीन निकालांचे संदर्भ आहेत. परंतु निविदा प्रक्रियेत हस्तक्षेप नको असेसुद्धा अनेक न्यायालयीन निकालांचे संदर्भ आहेत.

### प्रक्रियेतील अपारदर्शकता

विकासकामांत अडथळा नको ही शासकीय भूमिका विशिष्ट कंत्राटदारांच्या पथ्यावर पडते. निवडणुका जाहीर होण्याआधीच्या काळात तर अशा निविदांचा महापूर येतो. निविदांची प्रक्रिया अपारदर्शक आहे. एखादी कंपनी निविदा निकषांत बसणारी असली तरीही ती मिळवून देणाऱ्या दलालांचे राजकीय लागेबांधे हे उघड गुपित आहे. थोडक्यात काय तर अतिशय अयोग्य, बेकायदा प्रक्रिया अतिशय प्रामाणिकपणे आपले हितसंबंध जोपासत असते. निविदा कशाप्रकारे वाटल्या जातात, निकषांत गरजेनुसार प्रशासनाकडून देण्यात येणारी लवचीकता, एकाच व्यक्तीकडून विविध कंपन्यांच्या नावाने भरण्यात येणारे अर्ज सारेच नियमात बसवून मुख्य हेतू साध्य केला जातो. निविदेसाठी आवश्यक निकष, अटी, शर्ती या केवळ प्रक्रियेतील पारदर्शकता दाखवण्यापुरत्या. पलीकडे सुरू असलेली अपारदर्शक प्रक्रिया कधीच आपल्यासमोर येत नाही. निविदांचे खरे लाभार्थी राजकीय नेत्यांचे भागीदार, नातेवाईक, मित्र असतात. एखाद्या बेरोजगार अभियंत्याला अथवा व्यक्तीला जर निविदा मिळालीच तर त्यातील भांडवलदार, भागीदार, वाटेकरी सामान्य व्यक्तीला कधीच माहिती होऊ शकत नाही. निविदा प्रक्रिया जणू एक नाट्यमय प्रयोगच आहे. इथले चेहरे आणि मुखवटे नेहमीच वेगळे असतात. त्यातील टक्केवारीला सीमाच नाही. निविदेतील कामाच्या मूल्यानुसार त्यातील टक्केवारी ठरलेली असते. काही कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकले जाते, परंतु तेच कंत्राटदार इतर कंपन्यांच्या माध्यमातून लाभार्थी ठरतात, अशी उदाहरणे आहेत. निविदा प्रक्रियेची नियमावली, निकष, पात्रता ठरवण्याचे अधिकार प्रशासकीय यंत्रणेतील उच्चपदस्थांनाच. तिथे प्रशासन ठरवेल तोच कायदा. एखाद्या कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकले तरीही तो कंत्राटदार दुसऱ्या कंपनीच्या माध्यमातून पात्र ठरल्याची अनेक उदाहरणे आहेत.

### बेहिशेबी अर्थव्यवस्था

निविदा प्रक्रिया ही देशातील स्वतंत्र अर्थव्यवस्था आहे. हजारो कोटींच्या निविदा आणि त्यांतील व्यवहार यांचा अंदाजच बांधता येणारा नाही. सामान्य बुद्धीच्या आकलनापलीकडचा हा आकडा आहे. असा कुठलाच शासकीय विभाग नाही जिथे निविदा काढल्या जात नाहीत. अगदी रस्ते धुण्यासाठीसुद्धा निविदा काढल्या जातात. सत्तेपुढे शहाणपण चालत नाही, हे पदोपदी राज्यकर्ते सिद्ध करत आले आहेत. शासकीय नोकरीतील अभियंते, तज्ज्ञांच्या कौशल्याचा उपयोग हा केवळ प्रशासकीय कार्यापुरता मर्यादित. एखाद्या विकासकामासाठी लागणाऱ्या आवश्यक खर्चापेक्षा कमी मूल्य असलेली निविदा मिळवूनसुद्धा कंत्राटदार कसा नफा कमावू शकतो, याचा या प्रक्रियेवरून अंदाज येतो. कधी कमी मूल्याच्या निविदा तर कधी एखाद्या वस्तूच्या बाजारभावापेक्षा अधिक मूल्याच्या निविदा सारेच अनाकलनीय आणि अविश्वसनीय. त्याला विकासाचे गोंडस नाव. जनतेचा पैसा कंत्राटदार आणि लाभार्थ्यांच्या फायद्यासाठी हवा तसा खर्च केला जातो. त्यासाठी सत्ताधीश उत्तरदायी नाहीत, हे लोकशाहीचे वैशिष्ट्य. निविदा प्रक्रियेसाठी विशेष कायदा केल्यास गैरप्रकार पूर्णपणे थांबतील असा दावा नाही, पण किमान निविदांचे न्यायालयीन निकषांवर मूल्यमापन तरी होईल आणि गैरप्रकारांना आळा बसू शकेल. राज्यकर्त्यांनी निविदा प्रक्रियेसाठी विशेष कायदा केल्यास, कायदा करण्यासाठी मात्र निविदा काढू नये इतकी माफक अपेक्षा आहे.

# संधी, आनंद आणि आत्मशोध

राष्ट्रीयीकृत बँकेत चार दशके सेवा केल्यानंतर, यंदाच्या जानेवारीत निवृत्तीला चौदा वर्षे पूर्ण झाली. मात्र, निवृत्ती म्हणजे केवळ कारकिर्दीचा शेवट नव्हे, तर एका नव्या प्रवासाची सुरुवात! नोकरीच्या व्यापात अनेक स्वप्ने अपूर्ण राहिली होती, पण निवृत्तीनंतर त्या स्वप्नांना आकार देण्याची संधी मिळाली. आत्मशोध, आनंद आणि नव्याने शिकण्याचा संकल्प केला आणि हे पर्व अधिक अर्थपूर्ण केले. या नव्या प्रवासाने माझे जीवन नवीन अर्थाने समृद्ध केले आहे. निवृत्ती ही एक नवा आरंभ आहे! नवीन कौशल्ये आत्मसात करणे, छंद जोपासणे, समाजसेवेत सक्रिय सहभाग घेताना जगातील नवनवीन ठिकाणांचा आनंद घेणे, हेच आता माझ्या जीवनाचे मुख्य उद्दिष्ट आहे. शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्यासाठी ध्यान, योग, नियमित फिरणे आणि निसर्गाच्या सान्निध्यात वेळ घालवण्याची सवय लावली. त्यामुळे सकारात्मक ऊर्जा मिळाली. लेखन व संपादन क्षेत्रात योगदान देण्यासाठी एका मासिकाचे पाच वर्षे कार्यकारी संपादकपद सांभाळले, ज्यामुळे लेखनकौशल्य अधिक समृद्ध झाले. विविध क्षेत्रांतील कलाकारांच्या प्रवासाचा मागोवा घेणारा विशेषांक प्रकाशित करत संपादनाच्या अनुभवात नवा आयाम जोडला. समाजसेवेची आवड जपत पुण्यातील लेकटाऊन ज्येष्ठ नागरिक संघाच्या सचिवपदाची जबाबदारी स्वीकारली. वृद्धाश्रम, अनाथाश्रमांना मदत, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साह्य, पर्यावरणपूरक उपक्रम, आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी फिजिओथेरपी शिबिरे, मोबाइल प्रशिक्षण वर्ग या उपक्रमांमुळे अत्यंत समाधान मिळाले. 'स्मृती वेध मेमरी क्लब' स्थापन करून ज्येष्ठ मंडळींसाठी मेंदूला चालना देणारे विविध उपक्रम सुरू केले. 'नवरंग कलामंच' आणि 'एव्हरग्रीन क्लब'च्या माध्यमातून सांस्कृतिक कार्यक्रम, लेखन स्पर्धा, काव्यवाचन, प्रवासवर्णन यांसारख्या उपक्रमांचे आयोजन केले. कोव्हिडच्या कठीण काळात ज्येष्ठ नागरिकांच्या मानसिक स्वास्थ्यासाठी व्हिडिओ आधारित उपक्रम सुरू केला. अद्ययावत तंत्रज्ञान शिकून विविध कला, शिक्षण, आणि जीवनशैलीविषयक प्रेरणादायक ७२ व्हिडिओ संकलित करून यूट्यूब वर अपलोड केले. या उपक्रमाने केवळ दस्तऐवज म्हणून काम केले नाही, तर ज्येष्ठ नागरिकांच्या जीवनात आशा आणि प्रेरणा निर्माण केली. त्यातून मानसिक तणावामध्ये लक्षणीय घट झाली आणि त्यांचा दृष्टिकोन अधिक सकारात्मक झाला. याच काळात सुरू केलेला संगीत वर्ग आजही यशस्वीरित्या चालू आहे आणि त्याने ज्येष्ठांच्या जीवनात आनंद, सुसंस्कृतता आणि मानसिक समाधान दिले आहे. नोकरीच्या काळात छंद जोपासण्याची संधी नव्हती, पण निवृत्तीनंतर सिंथेसायझर शिकून गाण्याचा आनंद घेऊ लागलो. लेखनकौशल्य विकसित करत अनुभव, आठवणी व कथा लिहिल्या, ज्यांना प्रमुख वृत्तपत्रांत स्थान मिळाले. ऑनलाइन कोर्सच्या मदतीने ऑइल पेस्टल चित्रकला आत्मसात केली आणि उत्तम प्रतिसाद मिळाला. नवीन शिकण्याची ओढ सतत वाढत राहिली. प्रवास हा केवळ भटकंती नसून जीवन समृद्ध करणारा अनुभव असतो. अनेक देश आणि भारतीय राज्यांना भेटी दिल्या. जुन्या मित्रांसोबत ५० वर्षांनंतर सुवर्णमहोत्सवी संमेलन घेतले, ज्यामुळे विविध संस्कृती, भाषा आणि परंपरांचा समृद्ध अनुभव मिळाला. नोकरीच्या व्यग्रततेमुळे कुटुंबासाठी पुरेसा वेळ देऊ शकलो नाही, पण आता नातवंडांसोबत खेळणे, शिकवणे, आणि त्यांच्या विश्वात रमणे यामुळे अपार आनंद मिळतो. जुन्या मित्रमंडळींशी संपर्क ठेवून नाती अधिक घट्ट झाली. प्रेम आणि आपुलकी असलेल्या नात्यांमुळे जीवन आपोआपच आनंदी झाले. आनंदी जीवनासाठी आपणच प्रयत्न करायला हवेत. सकारात्मक दृष्टिकोन बाळगा, छंद जोपासा, सतत नवीन गोष्टी शिका, समाजासाठी योगदान द्या आणि कुटुंब व मित्रांसोबत वेळ घालवा. निवृत्ती हा शेवट नसून, नव्या पर्वाची सुरुवात आहे. आनंद हा शोधायचा नसतो, तो जगायचा असतो!

# चटपटीत मसाला पाव

**साहित्य-** अमूल बटर अर्धी वाटी, दोन मध्यम कांदे बारीक चिरून, दोन मध्यम टोमॅटो बारीक चिरून, दोन टेबलस्पून बारीक चिरलेली हिरवी मिरची, एक टेबलस्पून आलं-लसूण पेस्ट, पाव वाटी बारीक चिरलेली कोथिंबीर, दोन चमचे पाव भाजीचा मसाला, पावभाजीचे पाव, एक चमचा लाल मिरचीचे तिखट, एक चमचा लिंबाचा रस, चवीनुसार मीठ.

**कृती-** तव्यावर अमूल बटर घालून गरम करून घ्या व त्यात बारीक चिरलेला कांदा घालून तो मऊ होईपर्यंत परता. मग त्यात आलं-लसणाची पेस्ट घालून दोन मिनिटे परतून घ्या. नंतर पाव भाजीचा मसाला घालून पुन्हा दोन मिनिटे परता. आता त्यात बारीक चिरलेले टोमॅटो व लाल मिरचीचे तिखट घालून टोमॅटो मऊ होईपर्यंत परता. मग हिरव्या मिरच्यांचे बारीक चिरलेले तुकडे घालून ते कुरकुरीत होईपर्यंत परता आता पावाच्या दोन्ही बाजूला (बाहेरून आणि आतून) बटर लावून दोन्ही बाजू भाजून घ्या.

नंतर आतील बाजूला आपण तयार केलेला मसाला सगळीकडे पसरून लावा. मसाला लावलेला पाव तव्यावर ठेवून डावाने सारखा दाबत राहून हलका भाजून घ्या. याच पद्धतीने सगळे पाव मसाल्याचे तयार करून घ्या. गरम मसाला पाव पुदिन्याच्या चटणी सोबत सर्व्ह करा.



# चेहरा आरोग्याचा आरसा

**आपली त्वचा हा आपल्या आरोग्याचा आरसा असतो. त्यातल्या त्यात चेर्हयाची त्वचा आपले आरोग्य कसे आहे हे दर्शवीत असते. जुन्या काळातील आयुवेर्दासारख्या सगळ्या जुन्या उपचार पध्दतींनी ही गोष्ट मान्य केलेली आहे. चीनमध्ये लोकप्रिय असलेल्या ऍक्युपंक्चर किंवा ऍक्युप्रेशर अशा जुन्या उपचार पध्दतीत सुध्दा चेहरा बघून आरोग्याचे निदान केले जाते.**

**आयुर्वेदामध्ये** जशी नाडी परीक्षा आहे. तेवढी ही चेर्हयाची परीक्षा शास्त्रशुध्द आणि नेमकी नाही. परंतु आरोग्याच्या काही तक्रारींचा अंदाज चेर्हयाच्या त्वचेवरून येतो असे अनेक अनुभवी डॉक्टर आणि वैद्यांचे म्हणणे आहे. आपल्या शरीरातल्या अवयवांमध्ये जे काही घडते त्याची प्रतिक्रिया चेर्हयावर उमटते आणि चेर्हयावरून जे दिसते त्याचाच विस्तार शरीरातल्या अवयवांमध्ये झालेला असतो असे चिनी लोक मानतात.

आधुनिक काळातले त्वचारोग तज्ञ देखील त्वचेवरच्या विविध डागांवरून रुग्णाच्या कोणत्या अवयवात काय बदल झालेले आहेत हे हेरता येते असे मान्य करत आहेत. काही डॉक्टरांनी तर चेर्हयावरचा कोणता बदल शरीरातल्या कोणत्या दोषाचा द्योतक आहे याचे काही ठोकताळे बसवलेले आहेत. तोंडामध्ये होणारे बदल किंवा दिसणारे दोष हे पोटातल्या विकाराचे द्योतक असतात. अपचन झालेल्या रुग्णाच्या तोंडाला दुर्गंध येतो. पोटातल्या काही विकारांचे प्रतिबिंब तोंड येण्यात उमटत असते. मूत्रपिंड आणि मूत्राशय यात काही दोष असतील तर ते दोष हनुवटीवर उमटतात. त्याच बरोबर लिव्हरमध्ये काही दोष असेल तर पापण्यामध्ये बदल होतात. काही लोकांना या गोष्टी मान्य नाहीत परंतु शेवटी हे ठोकताळे आहेत.





काही लोकांच्या चेर्हयावर मानेच्या मागे त्वचा झ्रिंकट पडायला लागते तेव्हा काही विशिष्ट आजार बळावत असतात. काही लोकांच्या चेहऱ्यावरच्या काही बदलांतून अनेक डॉक्टरांना तो मधुमेहाला बळी पडण्याची शक्यता लक्षात येते. चेहऱ्यातले काही बदल विशेषतः कानाच्या मागचे बदल हे रुग्ण ज्यादा अन्न प्राशन करत असल्यचे द्योतक असते असे काही डॉक्टरांच्या लक्षात आले आहे.

सतत पैशाच्या मागे लागणारे लोक, दारू पिणारे लोक, रक्तदाब वाढलेले लोक चेर्हयावरून सरळ सरळ ओळखू येतात मात्र त्यासाठी अनुभवी नजर लागते.

# पपई खाण्याचे १० आरोग्यदायी फायदे!

**चवीला गोड, शरीराला पोषक आणि त्वचेचे आरोग्य सुधारणारे फळ म्हणजे पपई ! पपई शरीराला गरम असल्याने वातावरणात गारवा असताना खाणे हितकारी आहे. तसेच पपई खाण्याचे आणखी दहा फायदेदेखील आहेत....**

▮ **शरीरातील कोलेस्टेरॉल कमी करते-** पपईमध्ये व्हिटामिन सी व फायबरचे प्रमाण अधिक असल्याने रक्तवाहिन्यांमध्ये कोलेस्टेरॉल साचून राहण्यापासून बचाव होतो. रक्तवाहिन्यांमध्ये कोलेस्टेरॉल साचून राहिल्याने हृद्यविकाराचा धोका संभवतो.

▮ **वजन घटवण्यास मदत होते-** एका मध्यम आकाराच्या पपईमध्ये 120 कॅलेरीज असतात. त्यामुळे जर तुम्ही वजन घटवण्याच्या विचारात असाल तर पपईचा आहारात नियमित समावेश करा. पपईतील डायटरी फायबर्समुळे वेळी-अवेळी लागणाऱ्या भूकेवर नियंत्रण मिळवणे शक्य होते.

▮ **रोगप्रतिकारशक्ती वाढते-** आजारांशी सक्षमतेने सामना करण्यासाठी तुमची रोगप्रतिकारशक्ती मजबूत असणे फार गरजेचे आहे. तसेच शरीरातील व्हिटामिन सीच्या गरजेपेक्षा 200% अधिक व्हिटामिन सी केवळ पपईमुळे मिळू शकते.

▮ **मधुमेहींसाठी गुणकारी-** पपई चवीला गोड असली तरीही त्यामुळे रक्तातील साखर वाढत नाही. कपभर पपईच्या तुकड्यांमधून केवळ 8.3 ग्रॅम साखर असते. यामुळे मधुमेहींनी पपई खाणे हितकारी आहे. तसेच पपई खाल्ल्याने मधुमेह जडण्यापासून बचाव होतो.

▮ **डोळ्यांचे आरोग्य सुधारते-** पपईमध्ये व्हिटमिन ए मुबलक प्रमाणात आढळते. डोळ्यांचे आरोग्य राखण्यासाठी व्हिटामिन ए अत्यंत गरजेचे आहे. वाढत्या वयानुसार दृष्टी कमी होण्याची शक्यता असते. या समस्येपासून बचावण्यासाठी पपईचा आहारात समावेश करावा.

▮ **सांधेदुखीपासून आराम मिळतो-** पपईमध्ये व्हिटामिन सी प्रमाणेच वेदनाशामक गुणधर्म असल्याने सांधेदुखीच्या रुग्णांना पपईचे सेवन फारच हितकारी आहे. पपईतील व्हिटामीन सी घटक सांध्यांना मजबुती देण्यास तसेच सूज कमी करण्यास मदत करतात.

▮ **पचन सुधारते-** आजकालच्या व्यस्त जीवनशैलीमुळे जंक फूड किंवा बाहेरचे जेवण टाळणे हे काहीसे कठीण आहे. त्यामुळे अशा खाण्याने पचनशक्ती बिघडण्याची शक्यता असते. अशावेळी पपई खाल्ल्याने अरबट-चरबट खाल्ल्याने होणारे दुष्परिणाम टाळण्यास मदत होते. पपईतील पपैन नामक एंजाईम पचन कार्य सुधारते.

▮ **मासिक पाळीचा त्रास कमी होतो-** अनियमित मासिक पाळी तसेच मासिक पाळीच्या काळातील त्रास अशा समस्या दूर करण्यासाठी पपई फारच उपयुक्त आहे.


▮ **कर्करोगापासून बचाव होतो-** पपईमधील ऍन्टीऑक्सिडंट घटक शरीरातील फ्री रॅडीकल्सपासून तुमचा बचाव करते. तसेच पपईतील बीटा कॅरोटीन आतड्यांच्या कर्करोगापासून बचाव करते.

▮ **ताण-तणाव कमी होतो -** दिवसभराच्या धावपळीनंतर वाटीभर पपईचे काप खाल्ल्यास थकवा कमी होण्यास मदत होते. तसेच व्हिटामिन सी शरीरातील हार्मोन्सचे प्रमाण संतुलित राखते.



# आता डेस्कटॉपवरून करा व्हॉट्सऍप व्हिडिओ आणि ऑडियो कॉल

**व्हॉट्सऍप कंपनी आपल्या यूजर्ससाठी नेहमीच नवीन फीचर्स आणते. आता कंपनी नवीन फीचर्स वर काम करीत आहे. व्हॉट्सऍप यूजर्सला आता डेस्कटॉपवरून सुद्धा कॉल करता येणार आहेत. या कॉलमध्ये ऑडियो आणि व्हिडिओचा समावेश असेल.**



**व्हॉट्सऍप** ने डेस्कटॉपसाठी अनेक फीचर्स आणले आहेत. परंतु, दोन फीचर्सची कमतरता अजूनही जाणवत आहे. पहिले आहे डेस्कटॉप वर व्हॉट्सऍप कॉल करणे आणि दुसरे डेस्कटॉपवर व्हिडिओ किंवा किंवा ऑडियो करणे. यातील एका फीचरची कमतरता आता जाणवणार नाही. खरं म्हणजे व्हॉट्सऍप ने विंडोजसाठी एक नवीन ऍप आणला आहे. हा ऍप वेगाने लोड होते. तसेच सहज इंटरफेस सोबत येते. याच्या मदतीने व्हॉट्सऍप आपल्या यूजर्सला जास्तीत जास्त ८ लोकांसोबत ग्रुप व्हिडिओ कॉल आणि ३२ लोकांसोबत ऑडियो कॉल करण्याची सुविधा देते.

**मैक ओएस ला ही सुविधा मिळणार**

समोर आलेल्या माहितीनुसार, फक्त विंडोजचा यात समावेश करण्यात आला आहे. परंतु, हे फीचर मॅकबॅकच्या यूजर्ससाठी उपलब्ध केले जाणार आहे. कारण, सध्या मॅक डेस्कटॉप व्हर्जन बीटा टेस्टिंग मध्ये आहे. नुकत्याच एका ब्लॉग पोस्टमध्ये मेटाने म्हटले की, विंडोजच्या इंस्टंट मेसेजिंग ऍप व्हॉट्सऍपला नवीन फीचर्स सोबत एक नवीन लूक मिळाले आहे. मेटाने म्हटले की, आम्ही विंडोजसाठी एक नवीन व्हॉट्सऍप ऍप आणले जात आहे. जे वेगाने लोड होईल. या ऍप सोबत मोबाइल व्हर्जनच्या सारखे इंटरफेस सोबत येईल.

**डेस्कटॉपवर व्हॉट्सऍप कॉल कसा कराल?**

डेस्कटॉपवर व्हॉट्सऍप च्या माध्यमातून व्हिडिओ किंवा ऑडियो कॉल करण्याची सुविधा अपडेट सोबत उपलब्ध आहे. या सुविधेचा लाभ घेण्यासाठी तुम्हाला डेस्कटॉप व्हॉट्सऍप ऍपला अपडेट करावे लागणार आहे. अपडेट करण्यात आल्यानंतर तुम्हाला मोबाइल इंटरफेस प्रमाणे व्हिडिओ कॉल आणि ऑडियो कॉलचे आयकॉन दिसेल.



# पोळीला तूप लावून खाणे आरोग्यास लाभदायक

**हेल्दी** राहण्यासाठी शरीरास सकस आहाराची फार गरज असते. आताच्या काळात सर्वांना फास्ट फूड जास्त आवडतात, त्यामुळे रोजच्या आहाराकडे दुर्लक्ष होते. फास्ट फूड आणि तेलकट पदार्थ आरोग्यास घातक असतात. कित्येक लोक पोळ्या बनवण्यासाठी तेल किंवा डालड्याचा उपयोग करतात. तर पोळ्या बनवण्यासाठी तूपाचा वापर शरीरास अधिक लाभदायक आहे. तूपामध्ये अनेक प्रकारचे पोषक तत्वे असतात. तुम्हाला वाटत असेल, तूप खाल्याने वजन वाढतं तर हा एक गैरसमज आहे.

▮ वजन कमी करण्यासाठी तूपाची मदत होते.

▮ तूप आपल्या शरीरातील मेटाबॉलिज्म वाढवण्यास मदत करतो. त्यामुळे वजन कमी करण्यास मदत होते.

**त्वचेसाठी लाभदायक तूप**

तूपामध्ये एन्टीऑक्सीडेंट घटक असतात ते त्वचेसाठी फार फायदेशीर असतात. त्याचप्रमाणे त्वचेमध्ये असलेले डेड सेल्स तूपाच्या नियमित सेवनाने नष्ट होतात.

## खेळानंतर स्नॅक्सचे सेवन मुलांसाठी घातक

अनेक मुले खेळून आल्यानंतर जास्त स्नॅक्स सेवन करतात, त्यांच्यात त्यामुळे अनावश्यक उष्मांक वाढतात. परिणामी त्यांना आवश्यक असलेला आरोग्यावरील परिणाम साध्य होताना दिसत नाही, त्यानंतर मग आहारात बदल करण्याची वेळ येते, असे एका संशोधनात दिसून आले आहे. 'अमेरिकन जर्नल ऑफ हेल्थ बिहॅवियर' या नियतकालिकात म्हटले आहे की, मुलांमध्ये खेळत असताना प्रत्येक खेळातून १७० उष्मांक जाळले जातात. हे खरे असले तरी खेळानंतर मुले अंदाजे २१३ उष्मांक घेतात. शाळेत खेळानंतर मुले दमतात व त्या नादात ते जास्त स्नॅक्स सेवन करतात. तरुणांच्या क्रीडा स्पर्धा, वाढदिवस यात स्नॅक्स सेवन करण्याची संस्कृतीच अमेरिकेत रूढ आहे, असे ब्रिगहॅम यंग विद्यापीठाच्या प्रमुख संशोधक लोरी स्प्रुअन्स यांचे म्हणणे आहे. खेळून आल्यानंतर मुलांनी गोड पदार्थ सेवन केल्याने त्यांच्यात उष्मांक वाढतात. या संशोधनानुसार तिसरी-चौथीतील मुले फुटबॉल, फ्लॅग फुटबॉल, बेसबॉल, सॉफ्टबॉल खेळतात. त्यांचे हे खेळ शारीरिक व्यायाम देणारे असले तरी नंतर ते उष्मांक वाढवणारे स्नॅक सेवन करतात त्यामुळे हवा तो परिणाम साध्य होत नाही. आईवडीलच या मुलांना ८० टक्के वेळा स्नॅक्स घेऊन देतात. ९० टक्के वेळा गोड शीतपेयेही घेऊन देतात, त्यामुळे त्यांच्या आरोग्यावर वाईट परिणाम होतो.

संशोधकांच्या मते खेळानंतरच्या स्नॅक्समधून २६ ग्रॅम साखर पोटात जाते. यात साखरयुक्त शीतपेये व इतर पेये मोठी घातक ठरतात. मुलांनी वयाच्या पाचव्या वर्षांपासून साठ मिनिटे तरी खेळले पाहिजे. त्याबरोबर जर उष्मांक अतिरिक्त वाढत असतील तर ते घातक आहे त्यामुळे मुलांना



# अशा पद्धतीने घरीच तयार करा फाऊंडेशन पावडर

**सध्या** लग्नसराईचा काळ सुरू आहे. आज कोणा मैत्रिणीचा साखरपुडा आहे तर उद्या मित्राचं लग्न. घरातही कोणत्या ना कोणत्या नातेवाईकाचे लग्न असतेच. या सगळ्यात प्रत्येक वेळी पार्लरमध्ये जाऊन मेकअप करणं परवडणारं असतंच असं नाही.



अनेकदा फाऊंडेशन, काजळ, लिपस्टिक आणि आयलायनर लावूनही मुली सुंदर दिसतात. पण तुम्हाला माहीत आहे का बाजारात मिळणारे फाऊंडेशन तुम्ही अगदी काही मिनिटांत घरच्या घरी करू शकता. तुम्ही हजारो रुपये महागड्या फाऊंडेशनसाठी खर्च करता का? तुम्ही जे महागडे मेकअपचे साहित्य वापरता त्यामध्ये वापरल्या जाणाऱ्या गोष्टी या त्वचेसाठी हानीकारक असतात. पण हेच मेकअपचे साहित्य जर तुम्हाला घरी तयार करता आले तर? चला तर मग घरच्या घरी फाऊंडेशन पावडर कसे तयार केले जाऊ शकते ते वाचू..



**साहित्य :**

- ऑलीव ऑईल
- जोजोबा ऑईल
- बदामाचे तेल
- चेहऱ्याला लावायची पावडर
- कोको पावडर

**कृती :**

चेहऱ्याला लावायच्या पावडरमध्ये कोको पावडर, ऑलीव ऑईल, जोजोबा ऑईल, बदामाचे तेल योग्य प्रमाणात टाका. हे मिश्रण जास्त जाड ही नको आणि जास्त पातळ ही नको. तयार झालेली पावडर बॉक्समध्ये टाकून सेट करा. १० मिनिटांत तयार आहे घरच्या घरी फाऊंडेशन पावडर.

# ब्राऊन राईस खा आणि निरोगी राहा

**तुम्हाला भात मनापासून आवडत असेल, पण वजन वाढेल या भीतीने तुम्ही तुमच्या आवडत्या अन्न पदार्थापासून लांब राहत असाल, तर आता तुम्हाला तुमचा मोह आवरण्याची जरासुद्धा गरज नाही. तुम्ही तुमच्या आहारामध्ये ब्राऊन राईस समाविष्ट करा आणि वजन वाढेल याची काळजी न करता भाताचे सेवन करा. ब्राऊन राईस म्हणजे नक्की काय, तर पॉलिश न केलेल्या, अन-रिफाइन्ड तांदळाला ब्राऊन राईस असे म्हटले जाते. तांदळाच्या दाण्याला सालीची दोन ते तीन आवरणे असतात. ब्राऊन राईस तयार करण्यासाठी तांदळावरील केवळ सर्वात बाहेरची, जाडसर असलेली साल काढली जाते. बाकीच्या पातळ साली तांदळावर तशाच ठेवल्या जातात, म्हणूनच हा तांदूळ दिसायला 'ब्राऊन', म्हणजेच भुरकट रंगाचा दिसतो. पांढरा तांदूळ तयार होताना त्यावरील सर्वच सालींची आवरणे काढून टाकली जातात, त्यामुळे तो तांदूळ शुभ्र पांढरा दिसतो. पण पांढऱ्या तांदळामध्ये केवळ स्टार्च असतो.**

**ब्राऊन** राईस आणि पांढऱ्या तांदळामध्ये कॅलरीज आणि कर्बोदकांचे प्रमाण जरी एकसमान असले, तरी पांढरा तांदूळ बनवण्याच्या प्रक्रियेमध्ये, त्यामध्ये असलेले बी३, बी१, बी६, ही जीवनसत्त्वे, मॅग्नेशियम, फॉस्फरस, लोह, फायबर आणि फॅटी ॲसिड्स ही पोषक तत्त्वे पूर्णतः नष्ट होऊन जातात. त्यामुळे पांढऱ्या तांदळापेक्षा ब्राऊन राईसचे सेवन आरोग्यास अधिक हितकारी असल्याचे आहारतज्ज्ञांचे म्हणणे आहे. ब्राऊन राईस मध्ये कर्बोदके, प्रथिने, फायबर, मॅग्नेशियम, थियामीन, फॉस्फरस, पोटॅशियम इत्यादी महत्त्वपूर्ण पोषक तत्त्वे असून, याचे सेवन शरीराच्या आरोग्यासाठी अतिशय फायद्याचे आहे.

ब्राऊन राईसमध्ये फायबर मोठ्या प्रमाणावर असून, यामुळे रक्तामधील घातक कोलेस्टेरोलचे प्रमाण कमी होते. तसेच रक्तामधील शुगर नियंत्रित होते.



त्यामुळे मधुमेह असणाऱ्यांना याच्या सेवनाने विशेष फायदा मिळतो. फायबरचे प्रमाण यामध्ये जास्त असल्याने भूक शमते, तसेच अन्नाचे पचन व्यवस्थित होते. त्यामुळे बद्धकोष्ठ किंवा पचनाशी निगडित इतर समस्या दूर होतात.

फायबरमुळे कोलोन आणि पचनेन्द्रियाचे कार्य सुरळीत ठेवण्यास मदत होते व कोलेस्टेरोलचे प्रमाण नियंत्रित राहिल्याने हृदयाचे आरोग्यदेखील चांगले राहते.

ब्राऊन राईसमध्ये असलेल्या सेलेनियम आणि फेनोल्स या तत्त्वांमुळे कोलोन कॅन्सर होण्याचा धोका मोठ्या प्रमाणात कमी होतो. तसेच ही तत्त्वे थायरॉइड ग्रंथीचे कार्य नियंत्रित करण्यास सहाय्यक आहेत. यामध्ये असलेले मॅग्नेशियम हाडांच्या आरोग्यासाठी चांगले असून, त्यामुळे नर्व्हस सिस्टमही चांगली राहते. शरीराची रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यास देखील ही सर्व तत्त्वे सहाय्यक आहेत. यामध्ये असलेल्या फायबरमुळे पोट खूप काळ भरलेले राहते. त्यामुळे भूक लागणे कमी होऊन, वारंवार काही ना काही खात राहण्याचे प्रमाण कमी होते. परिणामी वजन घटण्यास मदत होते.

# आरोग्यासाठी लिंबाचे फायदे

**लिंबू** हे फळ आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत उपयोगी आहेच, पण त्याशिवाय त्वचेच्या सौंदर्यासाठी देखील याचा वापर करण्याची पद्धत फार प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. लिंबाचा सुवास हा मन प्रफुल्लित करणारा आहे. किंबहुना मन उदास असताना लिंबाचा सुवास मनाला प्रसन्नता देणारा असल्याचे तज्ज्ञ म्हणतात. लिंबामध्ये जीवाणू प्रतिरोधक तत्त्वे आहेत. लिंबाचा रस हा केवळ त्वचेसाठी नाही, तर केसांच्या उत्तम आरोग्यासाठीही उपयुक्त आहे. लिंबाचा रस त्वचेवर लावल्याने त्यामुळे चेहऱ्यावरील काळे डाग, मुरुमे, पुटकुळ्या आणि इतर समस्या कमी होण्यास मदत होते. लिंबाच्या फोडी गुडघ्यांवर किंवा कोपरांवर चोळल्यास तेथील काळसरपणा आणि कोरडेपणा दूर होऊन तेथील त्वचा मुलायम होण्यास मदत होते. नखांवर आलेला पिवळेपणा हटवण्यासाठीही लिंबाचा रस उपयुक्त आहे. लिंबाचा रस संधिवात आणि पचनाशी निगडित समस्या दूर करण्याच्या उद्देशाने उपयुक्त आहे. तसेच ज्यांना किडनीशी निगडित विकार असतील, त्यांच्यासाठी लिंबाच्या रसाचे पाण्यामध्ये मिसळून केले



गेलेले सेवन उपयुक्त ठरते. या रसाच्या नियमित सेवनाने मलेरिया आणि कॉलरासारख्या रोगांची प्रतिकारशक्ती शरीरामध्ये निर्माण होत असते. लिंबामध्ये 'क' जीवनसत्त्व मोठ्या प्रमाणावर असून, यामध्ये 'इ' आणि 'अ' जीवनसत्त्वे, तांबे, क्रोमियम आणि भरपूर प्रमाणात अँटी ऑक्सिडंट्स असतात. लिंबाच्या फोडी रात्री झोपताना झोपण्याच्या खोलीमध्ये ठेवल्याने खोलीतील हवा जंतुमुक्त होते, तसेच खोलीमध्ये लिंबाचा मन प्रसन्न करणारा सुवासही दरवळत राहतो. रात्री झोपण्यापूर्वी लिंबाच्या फोडी झोपण्याच्या खोलीमध्ये ठेवल्या गेल्यास सर्दी-पडसे किंवा एखादी ॲलर्जी लवकर बरी होण्यास मदत होते.

# अनेक गुणांचा खजिना : काकडी

**जगामध्ये सर्वप्रथम ज्या भाज्या पेरल्या आणि उगवल्या गेल्या त्यामध्ये काकडी या फळभाजीचा समावेश आहे. काकडीची पैदास भारतामध्ये सर्वात आधी उत्तर भारतामध्ये सुरू झाली. वर्तमान काळामध्ये संपूर्ण जगामध्ये मोठ्या प्रमाणावर उगवल्या जाणाऱ्या भाज्यांमध्ये टोमॅटो, कांदे आणि फुलकोबी पाठोपाठ काकडीची पैदास सर्वात जास्त होत असते. अनेक जीवनसत्त्वे आणि क्षार यांनी परिपूर्ण असलेली ही फळभाजी आजकालच्या काळामध्ये 'सुपर फूड'च्या श्रेणीपर्यंत येऊन ठेपली आहे.**



**काकडी** हा एक लो कॅलरी अन्नपदार्थ असून, शंभर ग्रॅम काकडीमध्ये केवळ पंधरा कॅलरीज आहेत. वजन कमी करण्याची इच्छा असणाऱ्यांनी काकडीचा समावेश आपल्या आहारामध्ये अवश्य करायला हवा. यामध्ये अ, बी१, बी६, क ही जीवनसत्त्वे असून, काकडी पोटॅशियमचीदेखील उत्तम स्रोत आहे. शंभर ग्रॅम काकडीमध्ये सुमारे १४७ ग्रॅम पोटॅशियम असते, त्यामुळे याच्या सेवनाने रक्तदाब नियंत्रित होण्यास मदत मिळते. हृदयाच्या स्वास्थ्यासाठी देखील काकडीचे सेवन करणे चांगले.

काकडीमध्ये ९५ टक्के पाणी असल्याने याच्या सेवनाने शरीरामध्ये पाण्याची कमतरता होत नाही. तसेच यामुळे शरीराचे तापमान देखील नियंत्रित राहण्यास मदत होते. काकडीमध्ये अनेक रोगोपचारक गुण आहेत. यामध्ये असलेले पॉलीफेनोल्स अनेक तऱ्हेच्या कर्करोगांपासून शरीराचा बचाव करण्यास सक्षम आहेत. काकडीमध्ये पाणी आणि फायबर मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे याच्या सेवनाने शरीरातील घातक पदार्थ बाहेर टाकले जाऊन शरीराची पचनक्रिया सुरळीत राहते. काकडीचा रस दररोज घेतल्याने गॅसेस, ॲसिडिटी, छातीत जळजळ अशा अपचनाशी निगडित तक्रारींना आळा बसतो. काकडी सिलीकाचे उत्तम स्रोत आहे. सिलीकामुळे शरीरातील कनेक्टिव्ह टिश्यू बळकट होतात. मधुमेहाच्या रुग्णांसाठी काकडीच्या रसाचे सेवन विशेष फायद्याचे आहे. काकडीमध्ये अँटी ऑक्सिडंट्स मोठ्या प्रमाणावर असून काकडी त्वचेकरिता देखील चांगली आहे. काकडीमधील ॲस्कॉर्बिक ॲसिड आणि 'क' जीवनसत्त्वामुळे शरीरामध्ये कोलाजेनचे निर्माण होऊन त्यामुळे त्वचा सुंदर 'ब' नितळ दिसू लागते. तसेच याच्या नियमित सेवनाने केसांचे आरोग्यदेखील चांगले राहते. काकडी विकत घेताना नेहमी गडद हिरव्या रंगाची काकडी निवडावी. सालांवर डाग असलेली, हाताला नरम लागणारी आणि जाडसर दिसणारी काकडी घेऊ नये. काकडी फ्रीजमध्ये स्टोअर करावी, मात्र कोणत्याही प्रकारची फळे काकडीजवळ ठेवू नयेत, अन्यथा काकड्या लवकर पिवळ्या पडतील व त्यांची गुणवत्तादेखील कमी होईल.

## बदलापुरात सायंकाळी अतिक्रमण विरोधी कारवाई
# बाजारपेठ, पनवेल मार्गावरील अतिक्रमण हटवले



**बदलापूर :** फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यात बदलापूर शहर पदपथ मोकळे करण्यासाठी कुळगाव बदलापूर नगरपालिकेचे मुख्याधिकारी मारूती गायकवाड यांनी धडक कारवाई केली होती. त्यानंतर फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवड्यात सायंकाळनंतर शहराच्या प्रमुख वर्दळीच्या रस्त्यांना मोकळे करण्यासाठी सोमवारी कारवाई करण्यात आली. अचानक झालेल्या या कारवाईमुळे वर्दळीचे रस्ते मोकळे झाले. अनेक टपऱ्या, पदपथावरील दुकाने, हातगाड्या यावेळी हटवण्यात आल्या. नागरिकांकडून या कारवाईचे स्वागत केले जाते आहे.

### भाजी मंडईत गर्दी

रस्त्यावर, पदपथावर बसणारे विक्रेते, अनधिकृत फेरिवाले आणि हातगाड्या कारवाईमुळे सोमवारी सायंकाळी स्थानक परिसरातून पळाले. त्यामुळे नागरिकांनी स्थानक परिसरात असलेल्या अधिकृत भाजी मंडईत गर्दी केली होती. त्यामुळे विक्रेत्यांमध्ये समाधानाचे वातावरण होते. तर नागरिकही या कारवाईचे स्वागत करताना दिसत होते.

बदलापूर शहरात गेल्या काही महिन्यात महत्वाचे पदपथ, चौक, रस्ते आणि मोकळ्या जागा फेरिवाले, अतिक्रमणांनी गिळंकृत केले होते. पदपथही व्यापले गेल्याने पादचाऱ्यांना रस्त्याने चालावे लागत होते. परिणामी वाहतूक कोंडी आणि अनेक समस्या उद्भवत होत्या. त्यामुळे पदपथ आणि रस्ते मोकळे करावे, चौकातील अतिक्रमणे हटवावी अशी मागणी होत होती. फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यात जवळपास चार दिवस कुळगाव बदलापूर नगरपालिका प्रशासनाने शहरात अतिक्रमण हटाव मोहिम राबवली. मुख्याधिकारी मारूती गायकवाड यांनी केलेल्या या धडक कारवाईचे शहरातून कौतुक झाले. चार दिवस चाललेल्या या कारवाईत शहरातील महत्वाचे वर्दळीचे भाग, चौक यांच्यासह अंतर्गत रस्ते आणि पदपथ मोकळे झाले होते. त्यामुळे पदपथांनी मोकळा श्वास घेतला होता. मात्र दिवसा कारवाई होते आणि खरी गर्दी, कोंडी सायंकाळी होते त्यामुळे त्यावेळीही कारवाई करावी अशी मागणी जोर धरत होते. मुख्याधिकारी मारूती गायकवाड यांनी सायंकाळनंतरही कारवाई केली जाईल, असे जाहीर केले होते. त्यानुसार सोमवारी सायंकाळनंतर शहराच्या पश्चिम भागातील बाजारपेठ, खाऊ गल्ली परिसरात धडक कारवाई करण्यात आली. यावेळी मुख्याधिकारी गायकवाड स्वतः हजर होते. यावेळी अनेक दुकाने, हातगाड्या आणि टपऱ्यांवर तोडक कारवाई करण्यात आली. पूर्वेतील प्रस्तावित पनवेल मार्गावरही कारवाई करण्यात आल्याची माहिती मारूती गायकवाड यांनी दिली आहे.

सायंकाळी कारवाई केल्याने अचानक फेरिवाल्यांची तारांबळ उडाली. अनेकांनी आपले साहित्य हटवले. मात्र अनेक साहित्य कारवाईत आले. या कारवाईमुळे सायंकाळनंतर बाजारपेठ परिसर मोकळा वाटत होता. ही कारवाई यापुढेही सुरूच राहील अशी माहिती गायकवाड यांनी दिली आहे.

# टिटवाळ्यात बेकायदा बांधकामे करणाऱ्या ५ बांधकामधारकांवर फौजदारी गुन्हे
## ८०० हून अधिक बेकायदा बांधकामे तोडल्यानंतर आता गुन्ह्यांच्या प्रक्रिया

**कल्याण :** कल्याण डोंबिवली पालिका हद्दीत टिटवाळा-मांडा परिसरात गेल्या काही वर्षात उभारण्यात आलेली ८०० हून अधिक बेकायदा बांधकामे मागील २५ दिवसात अ प्रभागाचे साहाय्यक आयुक्त प्रमोद पाटील यांनी भुईसपाट केली. या बेकायदा बांधकामांविरुध्दची कारवाई टिटवाळा परिसरात सुरू असताना, आता बेकायदा बांधकामे उभारणाऱ्या बांधकामधारकांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यास सुरूवात करण्यात आली आहे. बुधवारी टिटवाळा पोलीस ठाण्यात पाच बेकायदा बांधकामधारकांवर गुन्हे दाखल करण्यात आले.

किताबुल्ला शेख, बैतुल्ला शेख, मुखलीस खालीक काबाडी, इफतीकार खालीक काबाडी, जुल्फकार खालीक काबाडी यांच्या विरुध्द महाराष्ट्र प्रादेशक व नगररचना नियोजन आणि महापालिका अधिनयमाने हे गुन्हे आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड, अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड यांच्या आदेशावरून अ प्रभागाचे साहाय्यक आयुक्त प्रमोद पाटील, अधीक्षक शिरीष गर्गे यांनी दाखल केले.

अधीक्षक गर्गे यांनी पोलीस ठाण्यातील तक्रारीत म्हटले आहे,



"बेकायदा बांधकाम करणाऱ्यांविरुध्द पहिले एमआरटीपीचा गुन्हा आणि नंतर ते बांधकाम जमीनदोस्त करण्याचे आदेश आयुक्त डॉ. जाखड यांनी दिले आहेत. त्याप्रमाणे यापूर्वीची जुनी बेकायदा बांधकामांची प्रकरणे बाहेर काढून त्यांच्यांवर एमआरटीपीचा गुन्हा आणि त्यानंतर ती सर्व बेकायदा बांधकामे भुईसपाट करण्याची कारवाई सुरू केली जाणार आहे. टिटवाळ्यातील कारवाईने नवीन बांधकामे ठप्प झाली आहेत."
**-प्रमोद पाटील (साहाय्यक आयुक्त, अ प्रभाग)**

मुखलीस काबाडी, इफ्तीकार, जुल्फेकार यांनी सर्वे क्रमांक १७८ या भूक्षेत्रावर पालिकेच्या बांधकाम परवानग्या न घेता बेकायदा बांधकामे उभारण्यासाठी जोत्यांची बांधकामे करून ठेवली होती.

याविषयी अ प्रभागात तक्रारी प्राप्त झाल्यानंतर तत्कालीन साहाय्यक आयुक्त संदीप रोकडे (निलंबित) यांनी तिन्ही बांधकामधारकांना बांधकामाच्या अधिकृततेची कागदपत्रे अ प्रभागात सादर करण्याची नोटीस बजावली होती. विहित वेळेत ही कागदपत्रे तिन्ही बांधकामधारक सादर करू शकले नाहीत. रोकडे यांनी ही बांधकाम अनधिकृत घोषित केली होती. ही बांधकामे तोडण्याची कारवाई व एमआरटीपीचा गुन्हा दाखल करण्याची कारवाई रोकडे यांनी केली नव्हती.

टिटवाळ्यातील बल्याणी भागात आदिवासी पाड्या जवळ पाण्याच्या टाकीजवळ किताबबुल्ला, बैतुल्ला शेख यांनी पाच गाळ्यांची बेकायदा बांधकामे केली होती. तत्कालीन साहाय्यक आयुक्त रोकडे यांनी बांधकामधारकांना नोटिसा पाठवून बांधकामाची कागदपत्रे अ प्रभागात दाखल करण्याचे आदेश दिले होते. बांधकामधारकांनी कोणतीही कागदपत्रे अ प्रभागात सादर केली नाहीत. रोकडे यांनी ज्या पाच जणांच्या बेकायदा बांधकामांवर कारवाई केली नाही. ती बांधकामे अनधिकृत घोषित करून त्या बांधकामधारकांवर विद्यमान साहाय्यक आयुक्त प्रमोद पाटील यांनी बुधवारी एमआरटीपीचे गुन्हे दाखल केले. यापूर्वी रोकडे यांनी नोटिसा दिलेली, पण एमआरटीपी, अनधिकृत घोषित न केलेली प्रकरणे बाहेर काढून त्यांच्या विरुध्द साहाय्यक आयुक्त पाटील यांनी कारवाई सुरू केली आहे.

## एका दिवसात तीन ठिकाणी मीटरला आग लागल्याच्या घटना



**ठाणे :** ठाणे महापालिका क्षेत्रात एकाच दिवसात तीन ठिकाणी मीटरला आग लागल्याच्या घटना घडल्या आहेत. तापमान वाढल्यामुळे विजेच्या उपकरणांवर होणारा ताण वाढला असून, त्याचा परिणाम अशा घटनांवर होत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे अशा घटना टाळण्यासाठी वेळच्या वेळी देखभाल आणि विजेची उपकरणे दुरुस्त करणे गरजेचे असल्याचे महावितरणाच्यावतीने सांगण्यात आले आहे. ठाणे महापालिका क्षेत्रामध्ये ठाणे ते दिवा या शहरांचा समावेश होतो. या क्षेत्रात लागणाऱ्या आगींवर नियंत्रण ठेवण्यासाठी ठाणे महापालिकेचे आठ अग्निशमन केंद्रे आणि ९८ अग्निशामक वाहने कार्यरत आहेत. असे असले तरी शहरात विविध कारणांमुळे आग लागण्याच्या घटना समोर येत असतात. गेल्या काही वर्षांमध्ये ठाण्यात मोठमोठ्या गृहसंकुलांचा, हॉटेल्सचा आणि बिझनेस हब्सचा विकास झाल्यामुळे वीजेचा वापर वाढला आहे. त्यात गेल्या काही दिवसांपासून ठाण्याचे तापमान हे वाढल्याचे दिसून येत आहे. तापमान वाढल्याने घरातील पंखे, एसी, कुलर अशा विद्युत उपकरणांचा वापर अधिक होत आहे, ज्यामुळे मीटरला आग लागण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे.

# एमए शिक्षण घेणाऱ्यांची अतिरिक्त वेतनवाढ बंद, ठाणे महापालिकेचा निर्णय

**ठाणे :** राज्यात मराठी भाषा धोरण लागू झाल्यानंतर सरकारी कार्यालयांमध्ये मराठीत बोलणे अनिवार्य करण्यात आले असतानाच, दुसरीकडे कला पदव्युत्तर पदवी (एमए-मराठी) शिक्षण घेणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची अतिरिक्त वेतनवाढ बंद करण्याचा निर्णय ठाणे महापालिकेने घेतला आहे. यासंबंधीचे परिपत्रक पालिका प्रशासनाने काढले असून यामुळे एमएचे शिक्षण घेत असलेल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा हिरमोड झाला आहे. सातवा वेतन आयोगात शिक्षणावर आधारित अतिरिक्त वेतनवाढ देय असण्याबाबत शासन निर्देश प्राप्त झालेले नसल्याचे सांगत हा निर्णय घेतला आहे.

राज्यात मराठी भाषा धोरण लागू झाल्यानंतर सरकारी कार्यालयात मराठी अनिवार्य करण्यात आले आहे. यानुसार सरकारी, निमसरकारी, स्थानिक स्वराज्य संस्था, महामंडळे तसेच सरकारचे अनुदान घेणाऱ्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांना आणि तिथे येणाऱ्यांना मराठीतच बोलणे बंधनकारक करण्यात आले आहे. याची अंमलबजावणी न झाल्यास संबंधित अधिकारी, कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येणार आहे. मराठीच्या अनिवार्यतेबाबतचा शासन निर्णय नियोजन विभागाकडून काढण्यात आलेला आहे. एकीकडे मराठी भाषेच्या प्रचार आणि प्रसारासाठी राज्य शासनाकडून अशाप्रकारचे निर्णय घेतले जात असतानाच, दुसरीकडे कला पदव्युत्तर पदवी (एमए-मराठी) शिक्षण घेणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची अतिरिक्त वेतनवाढ बंद करण्याचा निर्णय ठाणे महापालिकेने घेतला आहे.



### परिपत्रकात काय म्हटले आहे

ठाणे महापालिकेत सातवा वेतन आयोग लागू झाला आहे. सातव्या वेतन आयोगामध्ये शिक्षणावर आधारीत अतिरिक्त वेतनवाढी देय असण्याबाबत शासन निर्देश अद्याप प्राप्त झालेले नाही. यामुळे डीएमजीएफएम, एलएसजीडी, एलजीएस, एमए(मराठी) आणि तत्सम अभ्यासक्रमासाठी दिली जाणारी अतिरिक्त वेतनवाढीबाबत प्रशासनाने अंतिम निर्णय सत्वर घेणे आवश्यक असल्याचे निरिक्षण मुख्य लेखा परिक्षकांनी नोंदविले आहेत. त्या अनुषंगाने पडताळणी करून यापुढे अशा प्रकारचे शिक्षण घेणाऱ्यांना अतिरिक्त वेतनवाढ देता येणार नाही, असे पालिकेने परिपत्रकात म्हटले आहे.

मराठी भाषेचा जास्तीत जास्त वापर व्हावा आणि या भाषेचा प्रचार व प्रसार व्हावा यासाठी ठाणे महापालिकेचे तत्कालीन सभागृह नेते आणि विद्यमान खासदार नरेश म्हस्के यांनी सर्वसाधारण सभेत कला पदव्युत्तर पदवी (एमए-मराठी) शिक्षण घेणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची अतिरिक्त वेतनवाढ देण्याचा ठराव मांडला होता. त्यास सर्वसाधारण सभेने त्यावेळेस मंजुरी दिली होती. यामुळे कला पदव्युत्तर पदवी (एमए-मराठी) शिक्षण घेणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन मिळाले होते. दरम्यान, ठाणे महापालिका प्रशासनाने नुकतेच एक परिपत्रक काढले असून त्यात डीएमजीएफएम, एलएसजीडी, एलजीएस, एमए(मराठी) आणि तत्सम अभ्यासक्रम पुर्ण करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना अतिरिक्त वेतनवाढ देता येणार नसल्याचे म्हटले आहे.

## मुंबई-पुणे टॅक्सी स्टँडला वडाळा येथील रहिवाशांचा विरोध
# आरटीओला भूमिका स्पष्ट करण्याचे उच्च न्यायालयाचे आदेश




वडाळा (पश्चिम) सिटीझन्स फोरमने याचिकेद्वारे ८ ऑगस्टचा संयुक्त सर्वेक्षण अहवाल आणि मुंबई-पुणे टॅक्सी मालक संघटनेला जागा देण्याचा प्रादेशिक परिवहन कार्यालयाचा (आरटीओ) २ सप्टेंबरचा आदेश रद्द करण्याची मागणीही केली आहे. मुंबई - पुणे टॅक्सी स्टॅण्डसाठी जागा उपलब्ध करण्याचा निर्णय घेण्यापूर्वी कोणतेही सार्वजनिक सर्वेक्षण करण्यात आले नाही किंवा रहिवाशांचे मत जाणून घेण्याचा प्रयत्न केला गेला नाही. प्रस्तावित जागेचा परिसर हा प्रामुख्याने निवासी आणि शैक्षणिक क्षेत्र आहे. या परिसरात मुलींचे वसतिगृहदेखील आहे. त्यामुळे या परिसरात टॅक्सी स्टॅण्ड बांधण्यात आल्यास त्याचा तेथील रहिवाशांच्या दैनंदिन जीवनावर, पर्यावरणावर आणि महिलांच्या सुरक्षिततेवर मोठ्या प्रमाणात परिणाम होईल, असा दावाही याचिकेत करण्यात आला आहे.

**मुंबई :** माटुंगा (पूर्व) येथील इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजीच्या (आयसीटी) मागील रस्त्यावर तिसरा मुंबई-पुणे टॅक्सी स्टँड बांधण्यात येणार आहे. मात्र, या प्रस्तावाला वडाळा (पश्चिम) येथील रहिवाशांचा विरोध असून जागेच्या पुनर्विचाराच्या मागणीसाठी त्यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. न्यायालयानेही रहिवाशांच्या याचिकेची दखल घेऊन राज्य परिवहन अधिकाऱ्यांना त्यावर भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले आहेत.

हे टॅक्सी स्टॅण्ड २४ तास सुरू राहून त्यामुळे परिसरात वाहतूक कोंडींची समस्या वाढेल, परिसरातील शांतता, वनस्पती आणि प्राण्यांवरही परिणाम होईल. तसेच, रहिवाशांना सार्वजनिक जागा वापरण्यापासून वंचित ठेवले जाईल. महिलांच्या सुरक्षिततेलाही धोका निर्माण होईल, असे याचिकाकर्त्यांनी म्हटले आहे. या स्टॅण्डसाठी जवळच्या बेस्ट बस आगारासारख्या पयार्यी ठिकाणांचा शोध घेण्यात आणि त्यांचा विचार करण्यास प्रतिवादी अपयशी ठरले आहेत.

कोणत्याही सारासार विचाराशिवाय शांतता क्षेत्रात अशा स्टँडला परवानगी देण्याच्या प्रतिकूल परिणामांबाबत आयसीटी आणि परिसरातील इतर सर्व संस्थांनी नाराजी व्यक्त केल्याचा दावाही याचिकाकर्त्यांनी याचिकेत केला आहे. न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे आणि न्यायमूर्ती नीला गोखले यांच्या खंडपीठापुढे रहिवाशांच्या याचिकेवर नुकतीच सुनावणी झाली. त्यावेळी, न्यायालयाने राज्य सरकारसह मुंबई - पुणे टॅक्सी मालक संघटनेला याचिकेवर उत्तर दाखल करण्याचे आदेश दिले.

# ऑनलाइन वाचनानंदातून मराठी भाषा संवर्धनाला बळ




**ठाणे :** वाचनाची आवड असूनही रोजच्या कामाच्या धबडग्यात वाचनासाठी वेळ पुरत नाही, हा काहीसा निराशेचा सूर अनेकांच्या कानावरून गेला असेल. पण, करोना काळात सर्वत्र निराशजनक वातावरण असताना ठाण्यातील काही जणांना आशेचे स्वर ऐकू येऊ लागले. हे काही जण १५ ते २० जणच होते. या साऱ्यांनी मिळून 'रसिक वाचक समूह' तयार केला. 'झूम' बैठकांद्वारे स्वतःला आवडलेल्या पुस्तकाची वैशिष्ट्ये आणि त्यातील विशेष परिच्छेदांचे प्रेक्षकांसमोर वाचन होऊन मग प्रश्नोत्तरे होऊन या उपक्रमाची सांगता होऊ लागली. कोरोना काळात सुरू झालेल्या या उपक्रमाला आजही उत्तम प्रतिसाद मिळत आहे, ही मोठी आनंदाची गोष्ट असल्याची प्रतिक्रिया 'रसिक वाचक समूह' सदस्यांनी व्यक्त केली. या घडीला या समूहाच्या रसिक संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. 'झूम'च्या माध्यमातून महिन्यातून दोनदा हा उपक्रम होतो. इतर प्रेक्षकांसाठी हा कार्यक्रम युट्यूब वाहिनीवर उपलब्ध करण्यात येत असल्याची माहिती 'रसिक वाचक समूहा'चे संस्थापक भूषण मुळ्ये यांनी दिली. कोरोना काळात प्रत्येकावरच मानसिक ताण होता. एक प्रकारची भीती होती. अशा वेळी ऑनलाइन वाचनानंदात वाढ झाली. या समूहात कोणी योग साधना करणारा होता. कोणी संगीताचे शिक्षण घेत होता. कोणी मैफलींना जाणारा होता. कोणी पुस्तक वाचनाचे कार्यक्रम घेत होते. सदाशिवराव कुलकर्णी यांना ऑनलाइन वाचन संकल्पना भावून गेली. त्यांनी भूषणच्या साथीने वाचन संस्कृती आणि मराठी भाषा संवर्धनाचा ध्यास घेतला. २०२१ मध्ये ऑनलाइन वाचन उपक्रमाला सुरुवात झाली. कोरोना काळात प्रत्येक शनिवारी हे सत्र होत असायचे. एका, दोन किंवा अधिक पुस्तकांचे रसग्रहण याठिकाणी केले जाते. करोनानंतर पुन्हा सर्व सुरळित झाले असल्यामुळे आता हा कार्यक्रम महिन्यातून दोन दिवस होत आहे. आता, उपक्रमात सदस्य संख्या वाढली असून नवी पुस्तके व्यक्तिचित्रणांचे वाचन केले जाते. या समुहातील सत्रांमध्ये ३० च्या पुढील वयोगटातील तर, काही सत्रांमध्ये १५ ते २० वयोगटातील तरुणमंडळी सहभागी होतात. ठाणेच नव्हे तर, इतर शहरातील तसेच जिल्ह्यातील वाचक या समुहाशी जोडला गेला आहे. काही कवी आणि लेखकांनी देखील या उपक्रमात सहभाग घेतला आहे.

# ठाणे जिल्हा क्षयरोग अधिकाऱ्याचा कर्मचाऱ्यांना मानसिक त्रास
## कर्मचाऱ्यांकडून उपसंचालकांकडे तक्रारी, तक्रारीनंतरही कारवाई नाही

**ठाणे :** ठाणे जिल्हा क्षयरोग विभागात नव्याने रुजू झालेल्या अधिकारी कडून कर्मचाऱ्यांना मानसिक त्रास तसेच वैयक्तिक कामे करुन घेतली जात असल्याचा आरोप काही कर्मचाऱ्यांकडून करण्यात आला आहे. यासंदर्भात, कर्मचाऱ्यांनी आरोग्य विभागाच्या उपसंचालकांकडे पत्राद्वारे तक्रार केली. परंतु, अद्याप यावर कोणतीही कारवाई झाली नसल्याने कर्मचाऱ्यांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे.

ठाणे जिल्हा सामान्य रुग्णालयात जिल्हा क्षयरोग विभाग आहे. या विभागाचे जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. आशा मुंजाळ आहेत. या आपल्या पदाचा गैर वापर करुन कर्मचाऱ्यांना मानसिक त्रास देत असल्याचा आरोप काही कर्मचाऱ्यांकडून करण्यात आला आहे. डॉ. आशा मुंजाळ यांनी कार्यभार स्विकारल्यापासून विभागातील कामाच्या स्वरुपात बदल झाले आहेत. त्या कर्मचाऱ्यांवर ताण टाकतात. तसेच कर्मचाऱ्यांना कार्यालयातील कामाव्यतिरिक्त वैयक्तिक स्वरुपाची कामे सांगितले जात असल्याची तक्रारी काही कर्मचाऱ्यांनी केली आहे. अनेकांना कार्यालयीन कामकाजाच्या वेळेनंतरही थांबण्यास भाग पाडले जाते, तसेच सुट्टी घेताना दबाव टाकला जात आहे. शिवाय या कार्यालयातील वर्ग ४ च्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या घरातीलही साफसफाई करण्यास सांगितले जाते, असे एका कर्मचाऱ्याने सांगितले. कर्मचाऱ्यांना होत असलेला हा त्रास वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचावा यासाठी कर्मचाऱ्यांनी पत्राद्वारे वरिष्ठ अधिकारी, आरोग्य विभागाचे उपसंचालक यांच्याकडे तक्रार केली आहे. परंतु, तक्रार करुन महिना उलटला असतानाही यावर कोणतिही कारवाई झाली नसल्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये भितीचे वातावरण पसरले आहे. तक्रार करुनही कोणतिही कारावई झाली नसल्यामुळे राज्य सरकारी गट ड चतुर्थ श्रेणी कर्मचारी मध्यवर्ती महासंघाच्या वतीने या विभागातील कर्मचाऱ्यांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे.

"कर्मचाऱ्यांनी ज्या तक्रारी केल्या आहेत. असा कोणताही प्रकार घडलेला नाही. मी कोणत्याही कर्मचाऱ्याला चुकीची वागणूक दिलेली नाही. तसेच या संदर्भात माझे म्हणणे लेखी स्वरुपात जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी आणि आरोग्य विभागाचे उपसंचालक यांच्याकडे सादर केले आहे. मी आजारी असतानाही तब्येत सांभाळत कार्यालयीन कामकाज हाताळत आहे. तरी, सुद्धा मला जाणीवपूर्वक त्रास देत मानसिक दबावाखाली आणण्याचा प्रयत्न कार्यालयीन कर्मचारी करताना दिसत आहेत."
**-डॉ. आशा मुंजाळ, जिल्हा आरो**

# येऊरमध्ये इंजेक्शन देऊन दोन बैल चोरीचा प्रयत्न

**ठाणे :** येथील येऊर गावातील एका शेतकऱ्याच्या दोन बैलांना काही जणांनी इंजेक्शन देऊन चोरून नेण्याचा प्रयत्न केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. ग्रामस्थांच्या सतर्कतेमुळे बैल चोरीचा प्रयत्न फसला असून यापैकी एकाला ग्रामस्थांनी पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले. यानंतर वर्तकनगर पोलिसांनी गुन्हा दाखल करून एकूण चार जणांना अटक केली आहे. ठाणे येथील येऊर गावातील पाटोणपाडा परिसरात विलास रघुनाथ बरफ (३६) हे कुटूंबासमवेत राहतात. या गावात त्यांची त्यांची वडिलोपार्जीत शेतजमिन आहे. ते आणि त्यांचे वडील असे दोघे शेती करतात आणि त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नातुन त्यांचा उदरनिर्वाह चालतो. तसेच त्यांकडे पाच बैल, चार गाई आहेत. शेतीचे कामकाज करण्यासाठी ते बैलांचा वापर करतात. दररोज सकाळी आठ वाजता ते सर्व जनांवरांना चारा चारण्यासाठी येऊरच्या जंगलात सोडतात. सायंकाळी ७.३० वाजता ते सर्व जनांवरे चरून स्वतःहुन गोठयात परत येतात. परंतु २६ फेब्रुवारीला त्यांनी नेहमी प्रमाणे जनावरे चरण्यासाठी जंगलात सोडली असता, दोन बैल सायंकाळी गोठ्यात परत आले नाहीत. त्यामुळे त्यांनी सर्वत्र शोध घेतला. परंतु त्यांना बैल आढळले नाहीत. त्यानंतर ते घरी परतले. २७ फेब्रुवारी रोजी पहाटे ३.३० वाजता ते घरी झोपलेले असताना त्यांना त्यांचे शेजारी राहणारे रमेश वळवी यांचा फोन आला.त्यांनी त्यांना पाटोणा पाडा, बस थांब्याकडे जाणाऱ्या पुलाजवळ येण्यास सांगितले. त्यावेळी त्यांनी काय झाले अशी विचारणा केली असता, दोन्ही बैलांना काही लोकांनी इंजेक्शन देवुन बेशुद्ध करून चोरी करून घेवून जात होते. त्यापैकी एकाला ग्रामस्थानी पकडले असून उर्वरित लोक पळून गेल्याचे वळवी यांनी सांगितले. त्यानंतर ते त्याठिकाणी गेले आणि यानंतर वर्तकनगर पोलिस ठाण्यात जाऊन याबाबत तक्रार दिली. तसेच ग्रामस्थांनी पकडलेल्या एकाला पोलिसांच्या ताब्यात दिले. याप्रकरणी वर्तकनगर पोलिसांनी गुन्हा दाखल करून चार जणांना अटक केली आहे. या वृत्तास वर्तकनगर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरिक्षक राजकुमार वाघचौरे यांनी दिला आहे.

# अपंग आणि मूक मुलीच्या आजारपणाला घरचे वैतागले
## हत्येला सीसीटीव्हीमुळे फुटली वाचा, आजी आणि आई विरोधात गुन्हा दाखल

**ठाणे :** नौपाडा येथील गावदेवी भागात मूक आणि अपंग मुलीची आई आणि आजीने हत्या केल्याचे प्रकरण समोर येत आहे. मुलीच्या आजारपणाला कंटाळून त्यांनी ही हत्या केली आहे. हत्येनंतर त्यांनी मुलीच्या प्रेताचे वाई येथे अंत्यसंस्कार देखील केले. याप्रकरणात पोलिसांनी मुलीच्या आजीला अटक केली आहे. तर तिच्या आईचा पोलीस शोध घेत आहेत.गावदेवी मंदिर परिसरात १७ वर्षीय मुलगी तिचे आई, वडिल आणि आजी सोबत राहात होती. मुलगी जन्मताच मूक आणि अपंग असल्याने ती अंथरूणावर खिळून असे. मुलगी आणि तिची आई गुरुवारपासून अचानक गायब झाली होते. त्यामुळे तिचे नातेवाईक तिच्या वडील आणि आजीकडे चौकशी करत होते.




### सीसीटीव्हीमध्ये काय दिसले

मुलीचा मृत्यू झाल्यानंतर मुलीची आईने एक मोटार नोंद केली होती. मोटार घराबाहेर आल्यानंतर तिघींनी तिचा मृतदेह बाहेर काढून मोटारीत भरला. आजी आणि आई देखील मोटारीत बसले. ते वाई येथे पोहचल्यानंतर एका स्मशानभूमीत मुलीच्या मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्यात आले. तीन ते चार दिवस उलटूनही एका मुलीची हत्या झाल्याबाबत कोणतीही माहिती नव्हती. परंतु सीसीटीव्ही चित्रीकरण प्रसारित झाल्यानंतर हा हत्येचा प्रकार समोर आला आहे.

परंतु मुलीला उपचारासाठी वाई येथे नेण्यात आल्याचे तिच्या कुटुंबाकडून सांगितले जात होते. दरम्यान, रविवारी त्यांच्या नातेवाईकांच्या मोबाईल क्रमांकावर एक सीसीटीव्ही चित्रीकरण प्राप्त झाले. त्यामध्ये आजी, मुलीची आई आणि मुलीच्या आईची मैत्रिण एका पांढऱ्या कपड्यामध्ये मृतदेह नेत असल्याचे दिसले. या घटनेनंतर तिच्या नातेवाईकांनी तात्काळ याप्रकरणात नौपाडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या तक्रारीनंतर पोलिसांनी आजीला ताब्यात घेऊन अटक केली. १५ फेब्रुवारीपासून मुलीची प्रकृती ढासळत होती. त्यामुळे तिला प्रचंड वेदना होत होत्या. रात्री-अपरात्री ती आरडाओरड कर असे. या त्रासाला कंटाळून तिच्या आईने तिला कसले तरी औषध दिले. हे औषध घेतल्याने तिचा मृत्यू झाल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. या प्रकरणात हत्येचा गुन्हा दाखल झाला आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई 400063 (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com